मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मंगळवार, १५ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ११५ | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६
किंमत : ३ रुपये



## आधार लाडक्या बहिणीला आशिर्वाद महायुतीला !



### महा आघाडी

- **तेलंगणात** महिलांना 2500 रुपये दिले नाही
- **हिमाचल प्रदेशात** महिलांना 1500 रुपये देणार अशी थाप मारून

**फसवलं !**

- **कर्नाटकात** अंगणवाडी व आशा सेविकांना वाढीव मानधन देणार सांगून

**गंडवलं !**

- **झारखंडमधे** बिनव्याजी 2 हजार रुपये देणार सांगून

**झिडकारलं !**

### महायुती शासित महाराष्ट्रात लाडकी बहिण योजना यशस्वी



4 हफ्ते जमा!

भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र

II वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, मंगळवार, १५ ऑक्टोबर २०२४

## धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्ताने बौद्धाचार्य जाधव, थोरात यांचा सन्मान

**मुंबई :** भारतीय संविधानाचे निर्माते बोधिसत्व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्ताने आज चेंबूर येथे लोखंडे मार्ग वरील आयोजित कार्यक्रमात बौद्धाचार्य देवराम कामाजी जाधव, दामोदर राऊबा थोरात, पुंडलिक मारुती सुरडकर, वामन राजाराम धनराज यांना प्रशस्तीपत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. बौद्ध सभा चेंबूर संघटनेचे अध्यक्ष किसन माने यांच्या हस्ते या सर्वांचा सन्मान करण्यात आला. हे सर्वजण महात्मा फुले नंबर एक येथील रहिवासी असून त्यांचे बुद्ध धम्म चळवळ वाढवण्यासाठी भरीव योगदान आहे. त्यांच्या या कामगिरीची दखल घेऊन त्यांचा हा येथोचित सन्मान करण्यात आल्याची माहिती बौद्ध सभा संघटनेच्या वतीने देण्यात आली. आम्ही बौद्ध धम्म चळवळ आणि आंबेडकरी चळवळ वाढवण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाचे या सन्मानाने आमच्या कार्याची दखल घेऊन केलेला हा आमचा गर्व आम्हाला पुढील चळवळीला गती देण्यास अधिक प्रोत्साहन ठरेल ,अशी प्रतिक्रिया सन्मानित बौद्धाचार्य देवराम जाधव आणि दामोदर थोरात यांनी बोलताना दिली आहे.



## थोडक्यात

### डॉ. कुमार सप्तर्षी यांना 2024 चा 'कर्मवीर भुषण पुरस्कार'

**मुंबई:** कर्मवीर दादासाहेब गायकवाड सांस्कृतिक केंद्राच्या वतीने - शोषित, वंचित, दलित व दुर्लक्षित घटकांच्या प्रगतीसाठी लक्षवेधी कार्य करणा-या तसेच आंबेडकरी चळवळीत झोकुन देणा-या सन्मानिय व्यक्तिस दरवर्षी मानाचा 'कर्मवीर भूषण पुरस्कार' प्रदान करण्यात येतो. या वर्षी हा पुरस्कार डॉ. कुमार सप्तर्षी, संस्थापक अध्यक्ष - युवक क्रांती दल, महाराष्ट्र अध्यक्ष- महाराष्ट्र गांधी स्मारक निधी व संपादक सत्याग्रही - विचार धारा यांना जाहीर करण्यात आला आहे. केंद्राचे अध्यक्ष विजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत एकमताने देण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. रू. 15000/- रोख, मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा पुरस्कार वितरण समारंभ मंगळवारी 15 ऑक्टोबर 2024 रोजी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांच्या 122 व्या जयंती दिनी देण्यात येणार असल्याचे संस्थेचे सरचिटणीस आयु. चंद्रकांत बच्छाव यांनी कळविले आहे.

### मनसे कार्यकर्त्याच्या हत्येप्रकरणी सहा जणांना अटक

**मुंबई:** मालाड पूर्व येथे काही दिवसांपूर्वी घडलेल्या मनसे कार्यकर्त्याच्या हत्ये प्रकरणी दिंडोशी पोलिसांनी गुन्हा दाखल करून सहा आरोपींना अटक केली आहे. त्यातील काही आरोपींविरोधात यापूर्वीही गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली.ही घटना शनिवारी संध्याकाळी मालाड पूर्व येथे रेल्वे स्टेशनजवळ घडली होती. आकाश माईन (वय २७ वर्ष) असे हत्या करण्यात आलेल्या मनसे कार्यकर्त्याचे नाव होते. याप्रकरणी दिंडोशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आकाश १३ ऑक्टोबर रोजी मालाड पूर्व शिवाजी चौक येथून दुचाकीवरून जात होता. त्यावेळी पुढे जाणाऱ्या रिक्षा चालकाने रिक्षा अचानक वळवल्याने त्यांच्यात वाद झाला. त्यातून त्याचे एका रिक्षावाल्याशी भांडण झाले. वाद वाढल्यानंतर रिक्षा चालकाचे मित्र, स्थानिक फेरीवाले तेथे जमले. जमलेल्या सुमारे १० ते १५ जणांनी मनसे कार्यकर्ता आकाश याच्यावर हल्ला केला. लाथा-बुक्क्यांनी केलेल्या मारहाणात तो गंभीर जखमी झाला. त्याला तात्काळ जवळच्या ट्रामा केअर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र रात्री बारा वाजण्याच्या सुमारास आकाश माईनचा मृत्यू झाला. या हल्ला प्रकरणी दिंडोशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाशच्या पायाला, हाताला, पोटावर व कंबरेला मारहाणीमुळे गंभीर दुखापत झाली होती. त्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# मी आप्पा समर्थक; वसईत बविआत उभी फुट अटळ...

## प्रतीक्षा राजीव पाटीलांच्या भाजप प्रवेशाची

प्रतिनिधी
■ वसई

बहुजन विकास आघाडीच्या (बविआ) राजकीय कोंदणात उभी फुट पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बविआचे वजनदार नेते राजीव यशवंत पाटील उर्फ नाना यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा सध्या जोरात सुरू आहेत. यामुळे बहुजन विकास आघाडीतील स्थानिक राजकारणाला नवे वळण मिळण्याची चिन्हे आहेत. राजीव पाटील यांच्या सोबत काही नगरसेवक देखील भाजपात दाखल होतील, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.



आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील बहुजन विकास आघाडीला कार्यकर्त्यांकडून मोठे समर्थन मिळत आहे. सोशल मिडियावर 'मी आप्पा समर्थक' या मोहिमेला भरभरून प्रतिसाद मिळत असून, ठाकूर यांच्या मागे सामान्य कार्यकर्त्यांची एकजूट दिसून येत आहे. राजीव पाटील यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा सुरू असताना, ठाकूर यांच्या नेतृत्वात बहुजन विकास आघाडीचा मजबूत पाया दिसतोय. राजीव पाटील यांचे बांधकाम व्यवसायिकांशी असलेले संबंध त्यांच्या भाजप प्रवेशात महत्त्वपूर्ण ठरू शकतात. तर दुसरीकडे, आमदार ठाकूर यांना कार्यकर्त्यांचा मोठा पाठिंबा असल्याने त्यांची पकड वसईत कायम राहणार असल्याचे चित्र दिसत आहे.

***राजकीय लढाईची रंगत वाढली***

*सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या आधी माजी आमदार विलास तरे यांनी बहुजन विकास आघाडी सोडून शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतरही राजेश पाटील यांच्या नेतृत्वात बहुजन विकास आघाडीने जोरदार कामगिरी केली होती. मात्र, आता राजीव पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे आगामी विधानसभा व पालिका निवडणुकांमध्ये बहुजन विकास आघाडीला मोठ्या संघर्षाचा सामना करावा लागणार आहे. या पार्श्वभूमीवर वसईतील स्थानिक राजकारण चांगलेच तापले आहे.*

# मोरी गावातल्या नदीपात्रात माती भराव

## ठेकेदाराच्या बेजबाबदार कारभारावर भाजप आक्रमक

प्रतिनिधी
■ वसई

वसई पूर्वेतील पोमण गावातील मोरी येथे रेल्वे ब्रिजजवळ केंद्रीय रेल्वे फ्रेट कॉरिडॉर प्रकल्पाचे काम सुरू आहे. मात्र ठेकेदाराने नदीपात्रात बेकायदेशीर माती भराव केला आहे, ज्यामुळे मोरी गावासह भेंडीपाडा व सारजामोरी या आसपासच्या गावांना पावसाळ्यात पुराचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे, तर भाजपने या मुद्द्यावर आक्रमक पवित्रा घेतला आहे.

मोरी गावात कामण आणि मोरी या दोन नद्यांचा संगम आहे. येथून जाणाऱ्या प्रवाहाला अडथळा निर्माण करून मातीचा भराव करण्यात आला आहे, ज्यामुळे नदीचा प्रवाह थांबला आहे. याचा परिणाम म्हणून भेंडीपाडा व सारजामोरीसारख्या परिसरात पावसाळ्यात पाणी साचण्याची समस्या वाढली आहे. २३ आणि २४ सप्टेंबर रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे या गावात पाणी साचून पूरस्थिती निर्माण झाली होती, मात्र नशिबाने पाऊस थांबल्याने गावांवर मोठा आघात झाला नाही. तरीही, ठेकेदाराने बेकायदेशीरपणे केलेल्या माती भरावामुळे यंदाच्या



पावसाळ्यात गावांवर मोठा पुराचा धोका उभा राहिला आहे.

भाजपचे वसई-विरार शहर जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र म्हात्रे यांनी या बेकायदेशीर माती भरावाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देत ठेकेदाराच्या मनमानी कारभाराची चौकशी करण्याची मागणी केली आहे. त्यांनी हा मुद्दा गंभीरतेने घेत, संबंधित प्रकल्पासाठी वसई तहसीलदारांनी माती भरावास परवानगी दिली आहे का, याबाबत विचारणा केली आहे. तसेच या प्रकारामुळे येथील गावकऱ्यांचे जीवन संकटात येण्याची शक्यता आहे, असे म्हात्रे यांनी सांगितले. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

***ग्रामपंचायतीकडून वेळोवेळी आवाज***

*पोमण ग्रुप ग्रामपंचायतीच्या हद्दीत मोरी गावातील नद्यांच्या प्रवाहात केलेला अडथळा ही गावकऱ्यांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. ग्रामपंचायतीने देखील ठेकेदाराच्या या बेकायदेशीर कृत्याविरोधात आवाज उठवला आहे. पंचायत सदस्यांनी प्रशासनाकडे तात्काळ उपाययोजनांची मागणी केली आहे, ज्यामुळे भविष्यात अशा परिस्थितीचा सामना करावा लागणार नाही.ज्या पद्धतीने माती भराव करण्यात आला आहे, त्यावरून गावकऱ्यांना पुढील पावसाळ्यात पुरस्थितीचा धोका वाटू लागला आहे. यावर प्रशासनाने तातडीने लक्ष न दिल्यास गावातील नुकसान मोठ्या प्रमाणात होऊ शकते.*

# कोंडीवटे लेणीवर धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी
■ मुंबई

कोंडिवटे बुध्द लेणी बचाव कृती समितीच्या वतीने महाकाली रोड, कोंडिवटे बुध्द लेणी ,अंधेरी पूर्व येथे 68 वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमच्या सुरुवातीला बौध्दचार्य प्रकाश जाधव, बौध्दचार्य शिवाजी डोंगरे,बौध्दाचार्य नारायण जाधव यांनी सामुदायिक त्रिसरण-पंचशील घेतले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू अक्षय आंबेडकर व पी.एस फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष प्रदिप शर्मा यांनी महामानव तथागत सिध्दार्थ गौतम बुध्द व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ नेते रतन अस्वारे तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सरचिटणीस प्रकाश जाधव यांनी केले.

"धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे महत्व" या विषयावर अक्षय आंबेडकर यांनी उपस्थित बौध्द बांधवांना मार्गदर्शन केले.संस्थेचे सहसचिव सुनील बोर्डे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांचे आभार मानले. सामाजिक कार्यकर्ते पृथ्वीराज मस्के,संजय धावारे, भिमराव गमरे,आशा जाधव,रेश्मा प्रथम गायकवाड,आशा साळवी,सिया बोर्डे,अलका अस्वारे,मिलिंद गमरे,जयपाल कौंडार,शंकर सुर्वे, शिवदास साळवी,राकेश कांबळे,प्रविण कासारे,मनिष धोत्रे,गणेश मुतुस्वामी,सुरेश सावंत,राजेश गायकवाड आदि पदाधिका-यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# कामणमधील मजूर महिला मृत्यू प्रकरणी भ्रष्ट अधिकारी येणार गोत्यात

## शिंदे गटाची कारवाईची मागणी

प्रतिनिधी
■ वसई

कामणमध्ये अनधिकृत बांधकामाची भिंत कोसळून एका महिला मजुराचा मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ माजली आहे. भूमाफियांनी हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला आणि मृत महिलेच्या पार्थिवावर परस्पर अंत्यसंस्कार केले. मात्र, शिंदे गटाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी या प्रकरणाला वाचा फोडली, ज्यामुळे स्थानिक पोलीस यंत्रणा जागी झाली आहे. शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख निलेश तेंडोलकर यांनी या प्रकरणात भूमाफियांसह भ्रष्ट पालिका अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

कामणमधील प्रकरण विशेषतः गंभीर आहे, कारण यामध्ये अनधिकृत बांधकामामुळे महिलेचा मृत्यू झाल्यानंतर तिच्या पार्थिवावर कोणत्याही अधिकृत तपासाशिवाय परस्पर अंत्यसंस्कार करण्यात आले. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या गंभीर प्रकरणात शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख निलेश तेंडोलकर यांनी पुढाकार घेतला असून त्यांनी नायगाव पोलीस ठाण्यात भूमाफियांविरोधात गुन्हे दाखल करण्यास भाग पाडले आहे. त्याचबरोबर, अनधिकृत बांधकामांना संरक्षण देणाऱ्या भ्रष्ट पालिका अधिकाऱ्यांवर तातडीने गुन्हे दाखल करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

या मागणीमुळे पालिकेतील भ्रष्ट अधिकारी अडचणीत येण्याची शक्यता आहे. विशेषतः जे अधिकारी अनधिकृत बांधकामांना थेट संरक्षण देत होते त्यांची चौकशी होण्याची मागणी वाढली आहे. या प्रकरणामुळे पालिकेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून यापुढे अनधिकृत बांधकामांच्या बाबतीत कठोर कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

***अनधिकृत बांधकामांचा धोका आणि भ्रष्टाचाराचा आरोप***

*वसई-विरार महापालिकेच्या हद्दीतील पेल्हार, वाकण पाडा, पोमण, वसई फाटा आणि आता कामण परिसरात अनधिकृत बांधकामे कोसळून अनेक निरपराध नागरिकांचा बळी गेला आहे. पालिकेतील अतिक्रमण विभाग आणि सीयूसी विभागातील काही भ्रष्ट अधिकारी आर्थिक लाभासाठी या अनधिकृत बांधकामांना संरक्षण देत असल्याचा आरोप होत आहे. स्थानिकांनी वारंवार तक्रारी करूनही केवळ थातूरमातूर कारवाई करून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप आहे.*

# स्वराज अभियानाचा निर्धार मेळावा; सत्तेतील अन्यायाविरुद्ध लढण्याची शपथ

प्रतिनिधी
■ वसई

रविवारी विरार पूर्व येथे स्वराज अभियानाच्या वतीने निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.ज्यात वसई-विरार भागातील स्थानिक नेत्यांवर आणि लोकप्रतिनिधींवर अन्यायकारक सत्ताधारणेच्या आरोपांसाठी आवाज उठवण्यात आला. या मेळाव्याचे मुख्य उद्दिष्ट अन्याय करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना पदावरून दूर करणे आणि जनतेवर होणाऱ्या अत्याचारांना थांबवणे होते.

धनंजय गावडे यांच्या अध्यक्षतेखालील या मेळाव्यात स्वराज अभियानाच्या अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावडे यांनी आपल्या भाषणात ठाकुरांच्या



सत्तेवर टीका करत "सत्तेचा अहंकार वाढला आहे, जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे. हा अहंकार आम्हाला फेकून द्यायचा आहे."असे वक्तव्य केलं आहे.

कार्यक्रमात अनेक वक्त्यांनी स्थानिक जनतेवर होत असलेल्या अन्यायाच्या घटना मांडल्या. यावेळी स्वराज अभियानाच्या कार्यकर्त्यांनी अन्यायाविरुद्ध लढा उभारून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्याची शपथ घेतली. या मेळाव्यातून ठरवले गेले की आगामी निवडणुकांमध्ये स्थानिक सत्ताधारी नेत्यांना जनतेने धडा शिकवावा आणि त्यांच्याविरुद्ध एक मजबूत पर्याय उभा करावा. सत्तेतील अन्यायकारक धोरणांवर, प्रस्थापित नेत्यांच्या भ्रष्टाचारावर आणि स्थानिक लोकांच्या समस्या यावर भर देत, स्वराज अभियानाच्या कार्यकर्त्यांनी स्थानिकांच्या न्यायासाठी लढण्याचा निर्धार केला आहे.

# कालिनामध्ये डॉ नितेश राजहंस सिंह यांनी केले विविध विकास कामांचे भूमिपूजन

प्रतिनिधी
■ मुंबई

दसऱ्याच्या पवित्र मुहूर्तावर जनसेवा हे तत्व सर्वोपरी ठेवून भाजप उत्तर मध्य मुंबई जिल्हा महामंत्री डॉ. नितेश राजहंस सिंह यांच्या हस्ते शनिवारी कालिनामध्ये प्रभाग क्र. 165,166,167,168 मध्ये विविध ठिकाणी विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. यामध्ये ओपन शेड, समाज मंदिर, गटर, फूटपाथ, लादीकरण, शौचालय नूतनीकरण अशा अनेक कामांचा समावेश होता. कलिना परिसरातील संभाजी चौक, वाडिया इस्टेट, बैल बाजार, संदेश नगर, न्यू मिल रोड, कुर्ला स्टेशन, मोरेश्वर पाटणकर मार्ग, ठाकूर रघुराजसिंह मार्ग आदी भागात विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.



यावेळी स्थानिक पदाधिकारी व स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. दिपू सिहं, भागेश चौधरी, सचिन हनुमंत, नरपत सिंग, भूपेंद्र सिंग, रवींद्र पुन्ना, रीना रॉय यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

# हलक्या वाहनांना पूर्ण राज्यात टोलमाफी द्या!

## सपा आमदार रईस शेख यांची मागणी

■ मुंबई

मुंबई शहरात प्रवेश करणाऱ्या पाच टोल नाक्यांवर हलक्या वाहनांना आजपासून जशी पूर्ण टोलमाफी दिली, तशी टोलमाफी संपूर्ण राज्यात लागू करावी, अशी मागणी समाजवादी पक्षाचे भिवंडी पूर्व चे आमदार रईस शेख यांनी केली आहे. तसेच नाशिक महामार्गाची टोल कंपनी दुरुस्ती करत नसल्याने पडघा टोलनाका बंद करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. यासंदर्भात आमदार रईस शेख म्हणाले की, मुंबई एन्ट्री पाँइंटचे जे पाच मुख्य मार्ग आहेत, त्यांची दुरुस्ती टोल कंपन्यांकडून वेळेत कधीच होत नाही. तरीसुद्धा आजपर्यंत या पाचही मार्गावर वाहनांना टोल भरावा लागतो आहे. ही जनतेची लूट आहे. त्यासदंर्भात मी वेळोवेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवून टोल रस्त्यांची दुरुस्ती होत नसल्याचे निदर्शनास आणून दिले होते. नियमबाह्य टोल वसुलीचा प्रकार राज्यात सर्वत्र आहे. उदाहरण नाशिक महामार्गाचे घ्या. या महामार्गावर टोल कंपनी रस्त्याची दुरुस्ती करत नाही. तरीसुद्धा पडघा येथे टोल वसूल केला जात आहे. राज्यात अनेक जिल्ह्यात टोल कंपन्यांची अशी लूट सुरु आहे.

# वनकामगारांच्या मागण्यापूर्ण ना झाल्यास हिवाळी अधिवेशनात पहिल्याच दिवशी धडकणार - डॉ. अजय पाटील

प्रतिनिधी
■ पालघर

म. रा. वनकर्मचारी व वनमजूर संघटना नागपूर ची नागपूर वन वृत्ताची आमसभा केंद्रीय अध्यक्ष डॉ. अजय पाटील यांचे अध्यक्षतेखाली हरिसिंग सभागृह, सेमिनरी हिल्स, नागपूर येथे पार पडली. सभेला नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा वन विभागातील पुरुष व महिला वनमजूर, संगणक चालक, वाहन चालक प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वन विभागात होऊ घातलेल्या बारा हजार नवीन स्थाई वनमजूरांच्या सरळ सेवा भरतीच्या पार्श्वभूमीवर सदर भरतीपूर्वी वन विभागात रोजंदारीवर काम करणारे वन कामगार यांना शासन सेवेत सामाऊन घेणे, नवीन भरती करताना



रोजंदारी/हंगामी वनमजूर, हंगामी/बाह्यस्त्रोतामार्फत कार्यरत संगणक चालक/वाहन चालक यांना राखीव कोटा देणे इत्यादी मुद्यांवर केंद्रीय अध्यक्ष डॉ. अजयभाऊ पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सदर आम सभेत केंद्रीय अध्यक्ष यांचे उपस्थितीत नागपूर वन वृत्ताची कार्यकारिणी गठित करण्यात आली त्यास सर्वानुमते मंजुरी देऊन ठराव पारित करण्यात आला. प्रकाश कोकणे यांची नागपूर वन वृत्त अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. तसेच प्रविण ठवरे यांची वृत्त सचिव तर प्रकाश शहारे यांची कोशाध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. सदर कार्यकारिणीमध्ये नागपूर, वर्धा, भंडारा व गोंदिया येथील इतर महिला व पुरुष वनमजूर, संगणक चालक, वाहन चालक यांची विविध पदांवर निवड करण्यात आली. आम सभेला अरुणभाऊ पेंदोरकर,सचिनभाऊ कापकर, आनंद तिडके इत्यादी उपस्थित होते.

# कुर्ल्यात आमदार मंगेश कुडाळकर यांचा विकासकामांचा झंझावात

## मुख्यमंत्री शिंदेंच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच लोकार्पण सोहळा संपन्न

प्रतिनिधी
■ मुंबई

कुर्ला विधानसभा क्षेत्रातील शिवसेनेचे आमदार मंगेश कुडाळकर यांनी आपल्या मतदार संघात विकासकामांचा झंझावात केला असून मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितिमध्ये भव्य सोहळा संपन्न झाला आहे. शिवसेना आमदार मंगेश कुडाळकर यांच्या कुर्ला विधानसभा मतदार क्षेत्रातील विविध विकासकामांचा भूमिपूजन तसेच लोकार्पण सोहळा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. यावेळी कुर्ला येथे संपन्न झालेल्या महत्वाच्या



विकासकामांचे ऑनलाईन पध्दतीने भूमिपूजन आणि लोकार्पण करण्यात आले.

या कामांमध्ये छेडा नगर उड्डाण पुलाचे लोकार्पण, पूर्व द्रुतगती महामार्गावरील बीकेसी कनेक्टर पासून ते यु-टर्न करिता प्रस्तावित असलेल्या पुलाचे भूमिपूजन, चुनाभट्टी रेल्वे फाटकावरून प्रस्तावित असलेल्या पुलाचे भूमिपूजन, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण आणि चुनाभट्टी प्रवेशद्वार यासोबत इतर विविध विकासकामांचे लोकार्पण, कामराज क्रीडांगणाच्या सुशोभीकरणाच्या कामाचे लोकार्पण, टिळक नगर येथील हनुमान मंदिर उद्यान नूतनीकरण आणि सुशोभीकरण कामाचे लोकार्पण झाले, नेहरूनगर येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणातील नाना-नानी पार्क आणि बालोद्यानाचे नूतनीकरण आणि सुशोभीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आले. कुर्ला विधानसभेमधील रस्त्यांच्या सिमेंट कॉंक्रिटीकरण कामाचे शुभारंभ झाला.

यावेळी आमदार मंगेश कुडाळकर, माजी खासदार राहुल शेवाळे आणि कुर्ला विधानसभा क्षेत्रातील शिवसेनेचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

**जाहीर सूचना**

या नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, गाव मौजे डोंगरे, तालुका वसई, जिल्हा पालघर, येथील मिळकत सर्व्हे क्र. ३, हिस्सा क्र. ३, क्षेत्र ४१०० चौ.मी., ही मिळकत मे. राज एटरप्राईजेस हयांचे मालकीची आहे. सदर मिळकतीपैकी क्षेत्र ९०४.३३ चौ.मी., ही मिळकत माझे अशिलांनी विकसित करण्यास घेतली असून सदर मिळकतीवर चार रो-हाऊसचे बांधकाम केले आहे. सदर रो-हाऊसचे भोगवटा प्रमाणपत्र मिळण्याकरीता माझे अशिलांनी वसई विरार शहर महानगरपालिकेकडे अर्ज दाखल केला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाही इसमाचा, व्यक्तीचा, गहाण, दान, दावा, वारसा, वहीवाट, विश्वस्त बोजा, विक्री, कुळारग, अदलाबदल वा अन्य हक्क, हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या २०३, अली प्लाझा, वर्तक रोड, विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर, या पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह कळवावा. अन्यथा तसा हक्क हितसंबंध नाही, असे समजून सदर मिळकतीवर कोणाचीही हरकत नसल्याबाबतचा दाखला देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दि. १५-१०-२०२४ वकील
(अॅड. कल्पना एस. म्हात्रे)

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts

Year - Twenty Nine
Issu - 115
R.N.I. Registration No. - 65609/96

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.

वर्ष- एकोणतीसावे
अंक - ११५
आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६
मुंबई/ पालघर | मंगळवार, १५ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - ११५ | किंमत : ३ रुपये
Email : vrittamanas1@gmail. com

## अभिनेते अतुल परचुरेंचं निधन



**मुंबई :** मराठी रंगभूमीवर प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे हरहुन्नरी कलाकार अतुल परचुरे यांचं आज निधन झालं. वयाच्या 57 व्या वर्षी अतुल परचुरे यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या जाण्याने मराठी सिनेविश्वार शोककळा पसरली आहे. नाटक,सिनेमा आणि मालिका अशा तिन्ही माध्यमांवर अतुल परचुरे यांनी त्यांच्या अभिनयाची छाप सोडली होती. मागील अनेक दिवसांपासून ते कर्करोगाशी झुंजत होते. इतकच नव्हे तर त्यांनी कर्करोगावर मात करत रंगभूमीवरचा अंक सुरुच ठेवला होता. त्यांच्या या नव्या अंकाचं अनेकांनी भरभरुन कौतुक केलं होतं. इतकच नव्हे तर त्यांनी नुकतच सुर्याची पिल्ले या नाटकाचीही घोषणा केली होती.

## वय 84 होऊ द्या, 90 होऊ द्या, हे म्हातारं थांबत नसतंय!



**प्रतिनिधी**
**फलटण**

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज आपल्या वक्तव्याने धमाल उडवून दिली. ते म्हणाले, आज या ठिकाणी काही तरुण मुलं माझा फोटो असलेला बोर्ड घेऊन उभे होते. माझ्या फोटोच्या खाली लिहिलं होतं, 84 वर्षांचा म्हातारा. तुम्ही काही काळजी करु नका. अजून लांब बघायचं आहे. 84 होवो, 90 होवो, हे म्हातारं काही थांबत नसतंय. हे म्हातारं महाराष्ट्राला योग्य रस्त्यावर आणल्याशिवाय स्वस्थ बसत नाही. तुम्ही काही काळजी करु नका. त्यांच्या फलटणमधील या वक्तव्याची मोठी चर्चा आज दिवसभरात रंगली आहे.

सध्या आपल्यापुढचा प्रश्न आहे की, महाराष्ट्र कुणाच्या हातात द्यायचा? सामान्य लोकांच्या हातात महाराष्ट्र द्यायचा की आणखी कुणाच्या हातात द्यायचा? आज रोज वर्तमानपत्र उघडलं की नवीन योजना बघायला मिळतात. कधी बहिणीबाबत असतात. कुठल्याही व्यक्तीला बहिणीबाबत आस्था असतेच. बहीण ही कुटुंबातली जिवाभावाची व्यक्ती असतेच. एक गंमत आहे बघा मागच्या दहा वर्षांत बहीण आठवली नाही. पाच वर्षे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य होतं तेव्हा बहीण दिसली नाही. बहीण दिसली कधी? लोकसभेला महाराष्ट्रात 48 पैकी 31 जागा महाविकास आघाडीने जिंकल्या म्हणून बहीण आठवली, असा टोला शरद पवार यांनी लगावला.

अजित पवार यांनी जे भाषण 5 जुलै 2023 ला केलं होतं त्यात त्यांनी शरद पवारांच्या वयाचा मुद्दा उपस्थित केला होता. वय 81, झालं 82 झालं तुम्ही थांबणार की नाही? आम्ही काम करतो तुम्ही मार्गदर्शन करा. या आशयाचं वक्तव्य अजित पवारांनी केलं होतं. आज हाच मुद्दा उपस्थित करत माझं वय 90 झालं तरीही होऊ द्या, हे म्हातारं काही थांबणार नाही!, असं शरद पवार यांनी आज यावर वक्तव्य करून एकच धमाल उडवून दिली.

# मुंबईतील 5 टोल नाक्यांवर छोट्या वाहनांना टोल माफ





**प्रतिनिधी**
**मुंबई**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्याआधीच महायुती सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. मुंबईतील प्रवेश करणाऱ्या पाचही टोल नाक्यांवर संपूर्ण टोल माफी करण्यात आली आहे. हलक्या मोटर वाहनांना ही टोल माफी असून आज रात्री 12 वाजल्यापासून या निर्णयाची अंमलबजावणी सुरु झाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत ही घोषणा केली आहे.

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाची आज बैठक पार पडली. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता कोणत्याही क्षणी घोषित होऊ शकते. त्यामुळे मंत्रिमंडळाची शेवटची बैठक ठरण्याची शक्यता आहे. या बैठकीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गेल्या काही दिवसांपासून सातत्याने मागणी होत असलेल्या टोलमाफीची अखेर घोषणा केली आहे. मुंबईत प्रवेश करणाऱ्या पाचही टोल नाक्यांवर टोल माफी दिली जाणार आहे. हा नियम केवळ हलक्या मोटर वाहनांना लागू असणार आहे. आनंदनगर, दहिसर, मॉडेला, वाशी, ऐरोली या टोल नाक्यांवर टोलमाफी करण्यात येणार आहे. मात्र अटल सेतूसाठी हा नियम लागू केला जाणार नाही.

राज्य सरकारने मंत्रिमंडळ बैठकीत धारावी पुनर्विकासासाठी मुंबईतील 125 एकर जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. देवनार डम्पिंग ग्राउंडची ही 125 एकर जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी दिली जाणार आहे. मागील मंत्रिमंडळाच्या बैठकीत धारावीच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी बोरिवलीची जागा देण्यात आली होती. आजच्या बैठकीत देवनार डम्पिंग ग्राउंडची जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, धारावी पुनर्विकासाची जबाबदारी अदानी उद्योग समूहाकडे दिली आहे. त्यामुळे आता नव्या वादाला पुन्हा एकदा तोंड फुटण्याची शक्यता आहे.

## धारावी पुनर्विकासासाठी 125 एकर जागा

### मंत्रिमंडळ निर्णय

1. मुंबईतल्या 5 प्रवेश मार्गांवरील पथकर (टोल) हलक्या वाहनांसाठी माफ. सोमवार रात्रौ 12 पासून अंमलबजावणी. (सार्वजनिक बांधकाम)
2. आगरी समाजासाठी महामंडळ (सामाजिक न्याय)
3. समाजकार्य महाविद्यालयांमधील अध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (उच्च व तंत्रशिक्षण)
4. दमणगंगा एकदरे गोदावरी नदी जोड योजनेस मान्यता (जलसंपदा)
5. आष्टी उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता (जलसंपदा)
6. वैजापूरच्या शनीदेवगाव बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता (जलसंपदा विभाग)
7. राज्य शेती महामंडळाची जमीन एमआयडीसीला हस्तांतरित (महसूल)
8. पाचपाखाडी येथील जमीन ठाणे मनपास प्रशासकीय भवनासाठी (महसूल)
9. खिडकाळी येथील जमीन हायब्रिड स्किल विद्यापीठासाठी विनामूल्य (महसूल)
10. राज्यात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी ) 2.0 राबविणार
11. पुणे मेट्रो रेल टप्पा-2 मधील रेल्वे मार्गिकांच्या कामांना मान्यता (नगर विकास)
12. किल्लारीच्या शेतकरी सहकारी कारखान्याचे कर्ज व्याजासह माफ (सहकार)
13. अडचणीतील सहकारी उपसा जलसिंचन योजनांचे थकीत कर्ज माफ (सहकार)
14. मिरजच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात इमर्जन्सी मेडिसिनची ३ पदे (वैद्यकीय शिक्षण)
15. खंड क्षमापित झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना जुनी पेन्शन योजना (वैद्यकीय शिक्षण)
16. मराठी भाषेविषयक जनजागृतीसाठी पंधरवडा (मराठी भाषा)
17. अण्णासाहेब जावळे मराठवाडा विकास मंडळासाठी अभ्यासगट
18. उमेदसाठी अभ्यासगट (ग्राम विकास)
19. कौशल्य विद्यापीठास रतन टाटा यांचे नाव (कौशल्य विकास)

## लॉरेन्सच्या पुढच्या टार्गेटवर सलमान खानसह आणखी चारजण

**प्रतिनिधी**
**मुंबई**

माजी मंत्री आणि अजित पवार गटाचे नेते बाबा सिद्दिकी यांची वांद्रे इथे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. या हत्येची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई टोळीने स्वीकारली आहे. सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांनी हत्येचे कारण सांगितले.




दरम्यान, NIA ने लॉरेन्स बिश्नोईची चौकशी केली असता धक्कादायक माहिती समोर आली आहे. लॉरेन्स बिश्नोईने रडारवर असणाऱ्या 5 व्यक्तींची नावे सांगितली आहेत.यामध्ये पहिल्या क्रमांकावर अभिनेता सलमान खान याचा समावेश आहे. बिश्नोई टोळीचा म्होरक्या सध्या गुजरातच्या साबरमती तुरुंगात आहे. असे असले तरी त्याचे चेले त्याच्या इशाऱ्यावर गुन्हा करत आहेत. अशातच NIA ने लॉरेन्स बिश्नोईची चौकशी केली असता त्याचं पुढचं टार्गेट अभिनेता सलमान खान असल्याचे जाहीर केले आहे. त्याचबरोबर अन्य चार जणांची नावे सुद्धा त्याने सांगितली आहेत. या यादीत दुसऱ्या क्रमांकावर पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला याचा मॅनेजर सगुनप्रीत सिंग याचे नाव आहे. तिसऱ्या क्रमांकावर गँगस्टर मंदीप धालीवाल, चौथ्या क्रमांकावर गँगस्टर कौशल चौधरी आणि पाचव्या क्रमांकावर बंबीहा टोळीचा म्होरक्या अमित डागर याचा समावेश आहे.

## भारताची कॅनडाविरोधात मोठी कारवाई
## 6 उच्चायुक्तांची हकालपट्टी

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

भारताचे उच्चायुक्त आणि इतर उच्च अधिकाऱ्यांवर पुराव्यांविना करण्यात आलेले आरोप स्वीकारले जाणार नाहीत. यामुळे आमच्या उच्चायुक्तांची सुरक्षा धोक्यात येऊ शकते, असे सांगत भारताने कॅनडाविरोधात मोठी कारवाई केली आहे. भारतातील कॅनडाच्या दूतावासातील सहा उच्चायुक्तांना केंद्र सरकारने निलंबित केले आहे. या सहा अधिकाऱ्यांना 19 ऑक्टोबरपर्यंत देश सोडण्यास सांगण्यात आले आहे.



प्रभारी उच्चायुक्त स्टीव्हर्ट रॉस व्हीलर, उप उच्चायुक्त पॅट्रिक हेबर्ट, फर्स्ट सेक्रेटरी मॅरी कॅथरीन जॉली, फर्स्ट सेक्रेटरी लॅन रॉस डेव्हिड ट्रायइट्स, फर्स्ट सेक्रेटरी एडम जेम्स, फर्स्टे सेक्रेटरी पाऊल ओरज्युअला यांची भारतातून हकालपट्टी करण्यात आली आहे.

## मोदींनी जाहीर केलेली 'मेक इन इंडिया' योजना ठरली 'फेक इन इंडिया'

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

नॉन बायोलॉजिकल पंतप्रधानांनी 2014 मध्ये 'मेक इन इंडिया'ची घोषणा नेहमीसारखे गाजावाजा करून केली होती. नरेंद्र मोदींनी तेव्हा चार उद्दिष्टे ठरवली होती. पण दहा वर्षांत त्याचा पुरता बोजवारा उडला आहे. गेल्या दशकात आर्थिक धोरणनिर्मिती स्थिर, अंदाजे आणि समजूतदार ठरली नाही. भीती आणि अनिश्चिततेच्या वातावरणामुळे खाजगी गुंतवणुकीच्या वाढीला खीळ बसली आहे. नरेंद्र मोदी यांच्या जवळच्या एक-दोन मोठ्या उद्योगसमूहांना पसंती मिळाल्यामुळे ही स्पर्धा थांबली असून 'मेक इन इंडिया हे केवळ फेक इन इंडिया झाले आहे असे माजी केंद्रीय मंत्री व अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या मीडिया विभागाचे चेअरमन जयराम रमेश यांनी म्हटले आहे.

मोदी सरकारच्या 'मेक इन इंडिया'ची पोलखोल करताना जयराम रमेश यांनी पुराव्यासह या योजनेचे अपयश मांडले आहे. जयराम रमेश म्हणतात, मोदींचा पहिला जुमला, हिंदुस्थानच्या उद्योगाचा वृद्धिदर



दरवर्षी 12 ते 14% टक्के वाढवणे ठरला कारण वास्तविक चित्र पाहता 2014 पासून उत्पादन क्षेत्राचा वार्षिक वृद्धिदर सुमारे 5.2% इतकाच राहिला आहे. दुसरा जुमला: 2022 पर्यंत 100 दशलक्ष औद्योगिक रोजगार निर्माण करणे परंतु सन 2017 मध्ये उत्पादन क्षेत्रातील कामगारांची संख्या 51.3 दशलक्ष होती ती 2022-23 मध्ये 35.65 दशलक्ष झाली आहे. तिसरा जुमला: उत्पादन क्षेत्राचा हिस्सा 2022 ते नंतर 2025 पर्यंत GDP मध्ये 25% पर्यंत वाढवण्याचे लक्ष्य ठेवले होता. परंतु 2011-12 मध्ये हिंदुस्थानच्या एकूण मूल्यवर्धित उत्पादनात (GVA) उत्पादन क्षेत्राचा वाटा 18.1% होता जो 2022-23 मध्ये 14.3% पर्यंत कमी झाला आहे. चौथा जुमला:चीनवर वरचढ होऊन हिंदुस्थानाला जगाचा नवीन कारखाना बनवणे आणि उत्पादन क्षेत्रात अग्रणी स्थानावर घेऊन जाणे पण वस्तुस्थिती अशी आहे की, चीन उत्पादित क्षेत्रांवर आपले वर्चस्व निर्माण करण्याऐवजी आपण त्यांच्यावर आर्थिकदृष्ट्या अवलंबित झालो आहोत. 2014 मध्ये चीनकडील आयातीचा वाटा 11% होता तर गेल्या काही वर्षांत वाढुन 15% झाला आहे. यामुळे नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या जवळपास सर्वच योजना फेल गेल्या असल्याचे स्पष्ट होते, असेही जयराम रमेश म्हणाले.

## सप्टेंबरमध्ये किरकोळ महागाई 5.49% पर्यंत वाढली
### भाज्यांच्या महागाईचा दर 11 टक्क्यांवरून 36 टक्क्यांवर पोहोचला

**प्रतिनिधी**
**नवी दिल्ली**

खराब हवामान आणि महागलेल्या भाज्यांमुळे सप्टेंबर महिन्यात किरकोळ महागाई 5.49 टक्क्यांवर पोहोचली आहे. ऑगस्टमध्ये ती 3.65% होती. ही 9 महिन्यांतील सर्वोच्च पातळी आहे.

अन्नधान्य महागाई दर 5.66% वरून 9.24% पर्यंत वाढला आहे. शहरी चलनवाढीचा दरही महिना-दर-महिना आधारावर 3.14%



वरून 5.05% झाला. ग्रामीण भागातील महागाई 4.16% वरून 5.87% पर्यंत वाढली आहे.

सप्टेंबर 2023 मध्ये अन्नधान्य महागाई 5.66% होती, ती आता 9.24% वर आली आहे. महागाईच्या बास्केटमध्ये खाद्यपदार्थांचा वाटा सुमारे 50% आहे. त्याची महागाई दर महिन्याच्या आधारावर 5.66% वरून 9.24% पर्यंत वाढली आहे. तर एक वर्षापूर्वी ऑगस्ट 2023 मध्ये अन्नधान्य महागाई 6.62% होती. म्हणजेच वार्षिक आधारावरही त्यात वाढ झाली आहे.

## राज्यपालनियुक्त आमदारांच्या यादीत 12 नव्हे 7 नावे
### महायुतीचा 3-2-2 चा फॉर्म्युला

**प्रतिनिधी**
**मुंबई**

गेल्या चार वर्षांपासून अडगळीत पडलेला राज्यपाल नियुक्त 12 जागांचा मुद्दा विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मार्गी लावण्याचा सरकार प्रयत्न आहे. राज्यपालनियुक्त आमदारांच्या निवडीसाठी मंत्रिमंडळ बैठकीत 7 जणांच्या नावाची यादी मांडण्यात आली. ही यादी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे पाठवली आहे. या यादीत राष्ट्रवादीचे संजय खोडके आणि पंकज भुजबळ यांच्या नावाचा समावेश आहे. भाजप आणि शिवसेनेने पाठवलेली नावे अद्याप समोर आली नाहीत.

### राष्ट्रवादीकडून खोडके अन् भुजबळ यांना संधी

राज्यपालांना 12 जणांना विधान परिषदेवर निवड करता येते. महायुतीमधी प्रमुख पक्षांनी 6-3-3 असा फॉर्म्युला निश्चित केल्याचे म्हटले जात होते. पण सध्या 7 जणांच्या नावाची यादी पाठवण्यात आली आहे. यामध्ये भाजप 3, शिवसेना 2 आणि राष्ट्रवादी काँग्रेस 2 असा फॉर्म्युला वापरला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजय खोडके आणि पंकज भुजबळ यांची वर्णी लागली आहे. तर भाजप आणि शिवसेनेकडून कुणाला संधी मिळणार, हे पहावे लागणार आहे.

जून 2020 मध्ये तत्कालीन राज्यपालांनी केली नव्हती नियुक्ती

महाविकास आघाडीने जून 2020 मध्ये 12 आमदारांच्या नियुक्तीची शिफारस केली होती. मात्र तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी काही नियुक्त्या दिल्या नाही. कोश्यारी मुद्दामहून अडवणूक करत आहेत, असा आरोप करत कोल्हापूर येथील सुनील मोदी यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली होती. राज्यात जुलै 2022 मध्ये एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर सत्ता परिवर्तन झाले. महाविकास आघाडीचे सरकार जाऊन महायुतीचे सरकार आले. त्यामुळे आधीच्या आमदारांची यादी बारगळली. आता विधानसभा निवडणुकीच्या अगोदर हा मुद्दा धसास लावण्याचा प्रयत्न करण्यात येत असून महायुतीच्या वतीने 7 जणांच्या नावाची यादी राज्यपालांकडे पाठवण्यात आली आहे.

## अमेरिका आणि ब्रिटनमधील 3 अर्थशास्त्रज्ञांना नोबेल पारितोषिक





**स्टॉकहोम ।** अमेरिका आणि ब्रिटनमधील तीन शास्त्रज्ञांना अर्थशास्त्राचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. विजेत्यांमध्ये तुर्की-अमेरिकन डॅरन एसेमोग्लू, ब्रिटिश-अमेरिकन सायमन जॉन्सन आणि ब्रिटन जेम्स ए. रॉबिन्सन यांचा समावेश आहे. विविध राजकीय संस्थांची निर्मिती आणि त्याचा समाजाच्या प्रगतीवर होणारा परिणाम याविषयी केलेल्या संशोधनासाठी त्यांना हा सन्मान मिळाला आहे. या तिन्ही अर्थतज्ज्ञांनी वर्षानुवर्षे प्रगती करूनही गरीब देशांचा श्रीमंत देशांसारखा विकास कसा होऊ शकला नाही, हे सांगितले आहे.

## गिरणी कामगारांसाठी ८१ हजार घरे बांधण्यासाठी करार

**प्रतिनिधी**
**मुंबई**

गिरणी कामगारांच्या हक्काच्या घरांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार हे प्रयत्नशील आहेत. गिरणी कामगारांच्या घरासाठी मुंबई महानगर क्षेत्रात 81 हजार घरे बांधण्यासाठी करार करण्यात येत आहे. गिरणी कामगारांचे 1 लाख 74 हजार अर्ज अर्ज प्राप्त झाले असून कामगार विभागाने 1 लाख 8 हजार अर्ज वैध ठरविले आहेत. गिरणी कामगारांसाठी यापुढेही जास्तीत जास्त घरे बांधण्यात येतील, असे प्रतिपादन गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी आज केले.

प्रकल्प प्रवर्तकांच्या निवडीसाठी स्वारस्थ अभिव्यक्ती प्रक्रीयेत पात्र ठरलेल्या (एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट) कर्मयोगी एव्हीपी रिॲलिटी आणि चढ्ढा डेव्हलपर्स ॲण्ड प्रोमोटर्स या पात्र प्रवर्तकांना मंत्री श्री.सावे यांच्या हस्ते हेतू पत्र (लेटर ऑफ इंटेन्ट) देण्यात आले, यावेळी ते बोलत होते. गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर सिंग यावेळी उपस्थित होत्या.

मंत्री सावे म्हणाले की, सन 1982 च्या संपानंतर बृहन्मुंबईतील 58 बंद झालेल्या आणि आजारी कापड गिरण्यांतील गिरणी कामगारांसाठी म्हाडामार्फत एकूण 15 हजार 870 सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे. म्हाडामार्फत आणखी 2874 सदनिकांचे गिरणी कामगारांना वाटप करण्यात येणार आहेत. उर्वरीत गिरणी कामगारांची पात्रता निश्चित करण्यात आली असून अजून साधारणत: १ लक्ष घरांची आवश्यकता असल्याचेही त्यांनी सांगितले.

## यांच्या काळात बाकी काही नाही वाढले, फक्त बिअरबार वाढले!

**प्रतिनिधी**
**सातारा**

गेल्या दीड-दोन वर्षात 2 पक्ष फोडून सत्तेत गेलेली लोकं प्रचंड विकास केल्याच्या आविर्भावात आहेत. पाटण विधानसभा मतदारसंघाची माहिती घेतल्यावर कळलं की, इथे बाकी काही नाही पण बिअरबार वाढले, अशा शब्दांत राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाईंवर खोचक टीका केली. ते पाटणमध्ये शिवस्वराज्य यात्रेत बोलत होते.



जयंत पाटील म्हणाले की, "मुंबईत जाणाऱ्या 5 मार्गावरील टोल हटवले. माझा त्याला विरोध नाही, परंतु निवडणुकीच्या तोंडावर असे निर्णय घेतले जात आहेत. याचा अर्थ आपण परत निवडून येणार नाही, याची त्यांना खात्री असावी. निवडणुकीत जो पैशांचा पाऊस पडणार आहे, ते आपल्याच खिशातून मारलेले पैसे असणार आहेत."

"सत्तास्थानी असताना विक्रमसिंह पाटणकर यांचं आदर्श काम आपण पाहिलं आहे. दुसऱ्या बाजूला मंत्रीपदाची झूल आहे म्हणून हवे ते करणारा लोकप्रतिनिधी आहे. अशा लोकांची झूल उतरवल्याशिवाय जनता गप्प बसत नाही. पाटण विधानसभा मतदार संघातील जनतेने या निवडणुकीत सत्यजितसिंह पाटणकर यांच्या मागे खंबीरपणे उभे राहावे," असं आवाहन जयंत पाटील यांनी केलं.

"सत्तेसाठी सरकार राज्याच्या तिजोरीची दिवाळी करायला चालले असल्याची टीका खासदार अमोल कोल्हे यांनी केली. या सरकारला घरी पाठवल्याशिवाय थांबायचं नाही. लोकसभेत मतांची कडकी झाल्यामुळे आता बहीण लाडकी झाली आहे," असा टोलाही खासदार कोल्हे यांनी शिवस्वराज्य यात्रेत बोलताना लगावला.

### आणखी एक सावजी ढोलकिया
## दसऱ्यालाच कर्मचाऱ्यांना दिल्या मर्सिडीज, इनोव्हा, क्रेटा

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

गुजरातचे हिरे व्यापारी सावजी ढोलकिया सर्वांच्या परिचयाचे आहेत. ते दिवाळीला आपल्या कर्मचाऱ्यांना फ्लॅट, आलिशान कार, बाईक आदी गोष्टी भेट देतात. तसाच एक उद्योगपती चेन्नईला आहे. या उद्योगपतीने दसऱ्यालाच आपल्या कर्मचाऱ्यांना 28 कार आणि 74 बाईक गिफ्ट दिल्या आहेत.

ही एक स्ट्रक्चरल डिझाईन कंपनी आहे, याकंपनीने कर्मचाऱ्यांच्या चांगल्या कामाची स्तुती करत ही भेट दिली आहे. यामध्ये इनोव्हा,



एक्स्टर, क्रेटा, आय 20, मर्सिडीज बेंझ, ब्रेझा व अर्टिगा या कार आहेत.

गेल्या 9 वर्षांपासून ही परंपरा कायम आहे. 9 वर्षांपेक्षा अधिक काळ काम करणाऱ्या कंपन्यांना कार आणि सात वर्षांपेक्षा अधिक काळ काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बाईक देण्यात आली आहे. कंपनीचे मालक श्रीधर कन्नन यांनी कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला निमंत्रण दिले होते. त्यांनी म्हटले की, 2005 मध्ये कंपनीची सुरुवात केवळ 4 कर्मचाऱ्यांनी झाली होती. आता दोन साईटवर 180 कर्मचारी काम करत आहेत.

एक चांगलं पुस्तक हजार मित्रांइतकं असतं आणि
एक चांगला मित्र एका ग्रंथालया इतका मोठा असतो,
त्यामुळे आयुष्यात चांगले मित्र बनवा.



- डॉ एपीजे अब्दुल कलाम
भारताचे माजी राष्ट्रपती

वृत्तमानस

मुंबई, मंगळवार, १५ ऑक्टोबर २०२४


# अखेर टोलचा झोल बंद

मुंबईमध्ये प्रवेश करणाऱ्या पाच टोल नाक्यांपासून आता हलक्या वाहनांची सुटका झाली आहे. अनेक वर्षांपासून मुंबईत दाखल होताना आणि मुंबईतून बाहेर जाताना रोड दिल्याशिवाय सुटका होत नव्हती. हलक्या वाहनधारकांसाठी हे टोल नाके जणू जीजीया करासारखे अन्यायी झाले होते. यातून टोल माफी मिळावी यासाठी विविध पक्ष संघटनांनी अनेक वर्ष लढा दिलेला आहे. टोल नाक्यांच्या परिसरात बसलेल्या रहिवाशांकडूनही टोल वसूल केला जायचा. त्यामुळे वाद झाला नाही असा एकह दिवस गेला नसेल. अनेक नियम धाब्यावर बसून टोल वसुली व्हायची. पण तू टोल कंपन्यांचे लागेबांधे थेट विविध पक्षातील राजकीय नेते स्थानिक पुढारी आणि पोलीस प्रशासनासारख्या यंत्रणेसोबत असायचे. त्यामुळे अनेकदा वाहनधारकांकडून चुकीबाबत आवाज उठवलेला असतानाही ते एकटे पडायचे. कोठूनच त्यांना मदत मिळायची नाही. त्यामुळे टोल यंत्रणा जणू मग्रूर झाली होती. त्यामुळे यातून कधी मुक्ती मिळतेय असे सामान्य वाहन चालकांना झाले होते. कामावर जाणाऱ्यांना रोज सकाळ संध्याकाळ पेट्रोल ओलांडून जाणे येणे करावे लागत होते. त्यामुळे रोजची होणारे ही वसुली त्यांच्या आईच्या नेहमीचेच एक संकट बनले होते. शिवाय सकाळ आणि संध्याकाळी जाणाऱ्यांची गर्दी प्रचंड असल्यामुळे कामावर जाताना आणि घरी येताना हमखास वाहतूक कोंडीचा सामना व्हायचा. रोज दोन टाईम होणारी ही कोंडी म्हणजे पैसे देऊन त्रास ओढून घेण्यासारखे असायची. परंतु रोज मरे त्याला कोण रे अशाप्रकारे हे कर्मचारी तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करायचे. मात्र आता या संकटांमधून त्यांची सुटका झाली आहे. मुंबईतील पाच महत्त्वाच्या टोल नाक्यांवरून हलक्या वाहनांना टोलमाफी देण्याचा निर्णय सर्वसामान्यांसाठी एक मोठा दिलासा ठरला आहे. वाशी, दहिसर, ठाणे, ऐरोली आणि मुलुंड या ठिकाणी दररोज प्रवास करणाऱ्या लाखो वाहनधारकांसाठी हा निर्णय आर्थिकदृष्ट्या फायद्याचाच आहे. टोल माफी केल्यामुळे सरकारचे करावे तेवढे अभिनंदन कमीच आहे. सर्वसामान्यांचे सरकार म्हणून पुन्हा एकदा सरकारने आपली ओळख या निर्णयातून करून दिली आहे. मात्र, या निर्णयाने काही आर्थिक आव्हानेही उभी केली आहेत, ज्यामुळे हा दिलासा आर्थिक धोका ठरू शकतो का, याचाही विचार करणे काळजी गरज ठरत आहे. सर्वप्रथम, सामान्य नागरिकांसाठी या निर्णयाचे फायदे बरेच स्पष्ट आहेत. रोज टोल भरून प्रवास करणाऱ्यांसाठी हा खर्च लक्षणीय असतो. यामुळे सर्वसामान्यांच्या खिशात आर्थिक बचत होईल. या बचतीमुळे नागरिकांच्या खर्चाच्या रकान्यात काही प्रमाणात तरी दिलासा मिळेल आणि त्यांना रोजच्या आर्थिक दडपणातून थोडाफार का होईना पण दिलासा मिळेल. दुसरीकडे, या निर्णयामुळे सरकारच्या तिजोरीवर मोठा भार येणार आहे. टोल हे राज्य सरकारसाठी मोठे उत्पन्नाचे साधन असते. या उत्पन्नातून रस्त्यांची देखभाल, सुधारणा आणि वाहतूक व्यवस्थापनासाठी खर्च केला जातो. टोलमाफीमुळे सरकारला मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि हा फटका इतर विकासकामांवर परिणाम करू शकतो, हे देखील लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. यामुळे अनेकांच्या मनात प्रश्न उभे राहतात – जर सरकारला टोलमाफीमुळे उत्पन्न गमवावे लागले, तर त्या कमतरतेची भर कशातून होणार? सरकारला हा आर्थिक धोका कसा हाताळता येईल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. तसेच, टोलमाफीमुळे भविष्यात खासगी वाहनधारकांची संख्या वाढेल अशी शक्यता आहे. वाहनधारकांना आता प्रवास करताना टोल देण्याची चिंता नाही, त्यामुळे बऱ्याच जणांनी आपली स्वतःची वाहने वापरणे जास्त सोयीस्कर ठरेल. परिणामी, मुंबईच्या रस्त्यांवरील वाहतुकीचे प्रमाण वाढू शकते, ज्यामुळे वाहतूक कोंडी आणि प्रदूषण यासारख्या समस्या भविष्यात उग्र रूप धारण करतील. वाढती वाहतूक आणि त्याच्याशी संबंधित समस्यांचे व्यवस्थापन करण्यासाठी सरकारला अतिरिक्त उपाययोजना कराव्या लागतील, ज्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता भासेल. टोलमाफीचा एक मोठा राजकीय पैलूदेखील आहे. हा निर्णय अनेकदा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून घेतला जातो, ज्यातून नागरिकांचा समर्थन मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रकारच्या निर्णयांमुळे निवडणुका जिंकण्याचे राजकीय महत्त्व असले, तरी आर्थिक शाश्वततेचे महत्त्व यामध्ये दुय्यम ठरते. दीर्घकालीन विचार करून निर्णय घेणे गरजेचे असते, परंतु राजकीय फायद्यासाठी अशा अल्पकालीन निर्णयांमुळे सरकारची आर्थिक परिस्थिती बिकट होण्याची शक्यता निर्माण होते. अशा परिस्थितीत, टोलमाफीचा निर्णय एका दुधारी तलवारीसारखा ठरतो. एका बाजूला तो सामान्य नागरिकांसाठी आर्थिक दिलासा आणि बचतीचा आनंद देतो, तर दुसरीकडे तो राज्याच्या आर्थिक आरोग्यावर दीर्घकालीन धोका निर्माण करू शकतो. सरकारने हा निर्णय घेतल्यानंतर त्याचा पुढे अतिशय संतुलित दृष्टिकोनातून विचार करावा लागेल. सरकारला यासाठी इतर महसुलाची साधन शोधणे किंवा पर्यायी उत्पन्न स्रोत उभारणे आणि वाहतूक व्यवस्थापनाच्या योजना प्रभावीपणे राबवणे यांसारख्या उपाययोजना तत्काळ करण्याची गरज आहे. टोलमाफीमुळे साधला गेलेला जनतेचा फायदा कायमस्वरूपी टिकवायचा असल्यास, आर्थिक धोरणांत दूरदृष्टी आवश्यक आहे. तात्पुरता दिलासा न देता, सरकारला दीर्घकालीन आर्थिक शाश्वततेची सुनिश्चिती करणे महत्त्वाचे ठरेल. अन्यथा, हा निर्णय नागरिकांच्या खिशात काही पैसे वाचवण्याइतपतच मर्यादित राहील आणि त्याचे खरे मूल्य लवकरच आर्थिक संकटाच्या रूपाने समोर येऊ शकते. कारण कोणत्याही योजनेमागे आर्थिक गणित अवलंबून असते. दीर्घकाळ चालणाऱ्या अशा योजनांवर काही उपक्रम अवलंबून असतात. त्या सर्वांचे नियोजन करून अशी योजना सुरू केली जाते. त्यामुळेच मुंबईमध्ये एन्ट्री करणारे हे पाच टोल नाके बंद करण्याचा तडका फडकी निर्णय घेतला गेला असला तरी येणाऱ्या काळात त्याचे काय परिणाम होणार आहेत हे समोर येईल. कारण किमान आणखीन काही वर्षे सुरू असणाऱ्या या टोल कंपन्यांचे होणारे नुकसान कुठून भरून निघणार हा प्रश्न अनुत्तरीत आहे. या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला असता या कंपन्या एवढ्या उदार नाहीत की त्या हे आर्थिक नुकसान सहन करू शकते. त्यामुळे त्यांचे थेट किंवा छुपी वसुली नक्कीच शासनाकडे असू शकते हे नाकारता येणे नाही. त्यामुळे आज हा टोल माफीचा निर्णय जरी उत्साही आणि आनंददायी वाटत असला तरी या निर्णयामागे काय गौड बंगाल आहे हे उघड झाले तर हा आनंद कितपत टिकेल याचीही शाश्वती मिळणे कठीण आहे. त्या प्रश्नाचे उत्तर मिळण्यासाठी येणाऱ्या निवडणुका पार पाडून येणारे सरकार स्थापन होणे आवश्यक आहे. कोणत्याही सरकार सत्तेवर आल्यावर या टोल माफीचे नेमके गौड बंगाल समोर येणार आहे. कारण सत्ता स्थापन झाल्यानंतरची वेळ मतदारांच्या हातातली नसणार आहे. मतदारांना आकर्षित करणारी नसणार आहे. त्यामुळे मतदानाचे काम झाले की सरकारचे खरे रूप समोर येईल. तोपर्यंत तरी या टोल माफीचा आनंद घेणे शक्य आहे. तसे पाहता हा निर्णय निवडणुकीच्या तोंडावर जरी घेतलेला असला तरी सध्या तरी तो वाहन चालक मालकांना समाधान देणारा ठरला आहे. त्यामुळे सरकार स्थापन होईपर्यंत तरी त्याला या निर्णयाचे नक्कीच समाधान घेता येणार आहे. पण या सोबतच नोटबंदीची दुसरी ही बाजू काहीशी विचारात घेणे क्रम प्राप्त ठरते. या टोल नाक्यांवर ज्या तरुणांना रोजगार मिळालेला आहे त्या रोजगाराची कपात होणे क्रम प्राप्त असल्याने ऐन दिवाळीमध्ये त्यांच्यावर बेकार होण्याची वेळ येणार आहे. त्यामुळे सरकारने टोल माफी सोबतच या टोलवर असलेल्या कर्मचाऱ्यांनाही किमान त्याच ठिकाणी अथवा इतरत्र रोजगार मिळाली याची गॅरंटी घ्यायला हवी. या निर्णयामधून कही खुशी कही गम असे न होता सगळ्यांनाच खुशी होणे आवश्यक आहे. यासोबतच किमान टोलचा झोल बंद झाला असे म्हणता येईल.

# वाचन प्रेरणा दिन

आज १५ ऑक्टोबर भारताचे माजी राष्ट्रपती मिसाईल मॅन डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. वाचन आणि लेखन आवडणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्मरणार्थ आजचा दिवस संपूर्ण देशात वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. देशातील प्रत्येक व्यक्ती सकारात्मक विचार करून स्वतःला समृद्ध कसा करेल आणि त्यायोगे देश महासत्ता कसा बनेल असाच विचार माजी राष्ट्रपती डॉ अब्दुल कलाम करत असत. अब्दुल कलाम यांनी १९९६ साली इंडिया २०२० हे पुस्तक लिहिले. याच पुस्तकाच्या आधारे तेंव्हाच्या नियोजन आयोगाने व्हिजन २०२० तयार केले. डॉ अब्दुल कलाम यांनी अग्निपंख नावाने आत्मचरित्र लिहिले त्यात त्यांनी बालपणापासून राष्ट्रपती बनण्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे. डॉ अब्दुल कलाम यांनी एकूण २४ पुस्तके लिहिली असून त्यातील बहुतांशी पुस्तके विद्यार्थी आणि शिक्षकांसाठीच लिहीली आहेत. विद्यार्थ्यांनी जास्तीतजास्त पुस्तके वाचून स्वतःचे ज्ञान दृढ करावे असा त्यांचा आग्रह होता. वाचनानेच माणूस समृद्ध बनतो असे त्यांचे मत होते. त्यासाठी लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करावी असे ते नेहमी म्हणत.

आजचा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे आजच्या मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी वाचनाची आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया व इंटरनेटच्या युगात पुस्तक वाचनाचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमधील अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे.




पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एकाच जागी धूळ खात पडत आहेत. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे.

आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरून चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी शाळा महाविद्यालयात हा दिवस साजरा केला जातो. या दिवशी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके दिली जातात. वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा केली जाते. आजच्या दिवशी शाळा महाविद्यालयात तसेच सरकारी आस्थापनात विविध कार्यक्रम, चर्चासत्रे, प्रशिक्षणे आयोजित केली जातात. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एक पुस्तक पुस्तके भेट द्यावे. आजच्या दिवशी प्रत्येकाने किमान एक पुस्तक वाचावे.

वाचन प्रेरणा दिन हा एक स्तुत्य उपक्रम आहे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे, याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्याने आपली ग्रहण क्षमता आणि स्मरण शक्ती अधिकाधिक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधिक प्रगल्भ होते. त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर, चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात. त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्त्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो. त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे.

मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टकोन कायमचा बदलतो. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा - कादंबरी वाचनाने वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्रे वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या मुलांना खूप ताण असतो. हा ताण कमी करण्याचे प्रभावी मध्यम म्हणजे वाचन एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो त्यांच्यात नैतिकतेची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातील नैतिक मूल्ये हरवत चालली आहेत त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवी. त्यासाठी वाचन प्रेरणा दिन यासारखे उपक्रम नक्कीच उपयोगी ठरेल.

- श्याम ठाणेदार
पुणे

# पत्र मानस

## माणसातील माणुसकी कसाईवृत्तीकडे का जातेय ?

माणसातली माणुसकी शुल्लक कारणांसाठी लोप पावताना दिसत आहे. एकदा मनुष्य या जगातुन गेला की या जन्मात परत येत नाही. पुनर्जन्म आहे की नाही या कथा तर कपोलकल्पित आहेत. कोणतेही दैनिक उघडले की हत्या, अत्याचाराच्या बातम्या वाचायला मिळतात.. एकेक घटना ऐकुन मन सुन्न झाल्याशिवाय राहात नाही. माजी मंत्री बाबा सिद्धीकी यांची गोळया घालुन हत्या करण्यात आली. माजी मंत्री पंकजा मुडे यांनी आपल्याच सभेत " प्रत्येकाचा हिशेब करणार.. कोयत्याला धार लावा "असे सांगितले. संभाजीनगर मधील गांधी नगरात त्रिपुरा औटे या १६ वर्षीय युवतीने गळफास घेतला. व मृत्युला कवटाळले. रिक्षाचे भाडे देण्याच्या बाचाबाचीत टिटवाळा गणपती मंदिराजवळ कल्याण कसारा जवळ रिक्षा चालकाने मारहाणीत प्रवाशाचा मृत्यु झाला. ठाणे येथील वागळे इस्टेट परिसरात राहाणाऱ्या आजीची नातवाने हत्या केली.पैशाचा नातवावर संशय घेतल्यानेच घटना घडली. मीरा रोड ठाणे हद्दीत पती नादीर खान याने पत्नी अमरिनचा भर रस्त्यात गळा कापून हत्या केली. एका खटल्यात न्यायालयीन आदेशावरून मुलाचा ताबा घेण्यावरून भांडण झाले. या अशा बातम्या वाढतच असल्याचे लक्षात येते.माणसातली माणुसकी लयाला जाताना दिसते. कोणत्याही भांडणाचा शेवट हाच मुळी "कसाई " वृत्तीकडेच का जातो ? संत समागमाच्या मार्गाने "माणसांनी माणुसकीने" वागले पाहिजे. कोणी मृत्युनंतर काही घेऊन जात नाही. मोकळया हाताने आला ,मोकळया हाताने जातो. जीवंत माणसांना स्मशानात "क्षणिक "दु:ख होते. " काय घेऊन गेला/गेली" म्हणुन वाईट वाटते . नंतर घरी आल्यावर" ये रे माझ्या मागल्या" कविवर्य भा.रा.तांबे आपल्या कवितेत " जन पळभर म्हणतील हाय हाय, तु जाता राहिल कार्य काय ? " मनुष्य मृत्यु नंतर पुन्हा येतच नाही. केवळ क्षणिक शोक केला जातो. त्या व्यक्तिने कार्य काय केले इतकेच शिल्लक राहते.

**- अनंत दत्ताराम दाभोळकर.अंधेरी**

## अंमली पदार्थ तस्करांचा पुरता बीमोड व्हावा

दहा दिवसापूर्वी महाराष्ट्रातील वाशीम येथे भाषण करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्ली येथे सापडलेल्या कोट्यावधीच्या अंमली पदार्थाचा उल्लेख करुन म्हटले की या अंमलीपदार्थांचे रॅकेट चालवणारा मुख्य सुत्रधार हा काँग्रेसचा नेता असल्याच पुढं आलं आहे. काँग्रेस देशातील तरुणांना अंमलीपदार्थ विकून त्या पैशांतून निवडणूक लढवण्याचा प्रयत्न करते आहे. आपल्याला या धोक्यापासून सावध राहायचं हवं. त्यानंतर अर्थातच विरोधी पक्षातील नेत्यांनी गुजरातमध्ये मागे सापडलेल्या अंमली पदार्थाची आठवण पंतप्रधानांना करुन दिली. तसेही गुजरातच्या सागरी किनाऱ्यावर अधूनमधून अंमली पदार्थांचा साठा जप्त होत आहे. मागच्या १५ दिवसातच तब्बल १३ हजार कोटींचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. तशी बातमीच प्रसिद्ध झाली आहे. जर असे साठे वारंवार जप्त होत असतील तर तस्कर पुन्हा पुन्हा अंमली पदार्थांची तस्करी करण्यास धजावतातच कसे? अंमली पदार्थांच्या धोक्यापासून सावध रहाण्याचा इशारा देणाऱ्या पंतप्रधानांनी ही बाब गांभीर्याने घेण्याची गरज आहे जेणेकरुन गुजरातमध्ये यापुढे अंमली पदार्थांची तस्करी करण्यास तस्कर धजावणार नाहीत.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

## राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे

राज्यातील कायदा व सुव्यवस्था उत्तम प्रकारे राखण्यात विद्यमान सत्ताधारी पक्षांना पूर्णपणे अपयश आल्याचे प्रकर्षाने दिसते. त्यांना काळजी आहे ती फक्त आपली सत्ता पुन्हा कशी राखता येईल याचीच ! ज्यांच्याकडे संवेदनशील असे गृह खाते आहे, त्यांचाच खात्यावर कोणताही वचक नसल्याने गुंडगिरी फोफावली आहे. परिणामी गुन्हेगारीचे राजकीयीकरण व पोलीस खात्याचे गुन्हेगारीकरण होताना दिसते. त्यांनी केलेल्या आपल्या मर्जीतील अधिकाऱ्यांच्या नेमणुका हाच मुळी कळीचा मुद्दा ठरत आहे. त्यामुळे गेल्या महिनाभरात हीट अँड रन, अंमली पदार्थांची तस्करी, महिला व बालकांवरील अत्याचार, बलात्कार, खून व खंडणी आदी गुन्हेगारी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्यातच गेल्या चार दिवसात मुंबईत १७ हत्या झाल्याचे वृत्त आहे. नागपूर नंतर शिक्षणाचे माहेरघर असलेले पुणे आता बदनामीच्या विळख्यात असून देशाची आर्थिक राजधानीही अशीच बदनाम होत असल्याचे दिसते. दस्तूर खुद्द राज्याच्या माजी मंत्र्याची त्याला संरक्षण असतानाही हत्या होणे, हे गृह खात्याचे अपयश म्हणावे लागेल. त्यामुळे शहरात पुन्हा एकदा गँगवॉर अवतरले की काय असे वाटू लागले आहे. त्यातच यांचे आमदारही गोळीबार करून दहशत निर्माण करीत असताना त्यांच्यावर कोणतीच कारवाई होत नाही. थोडा ठोकून काढा पोलिसांनाही दमदाट करणे, त्यांच्या कानशिलात लगावे पोलिसांकडून गाडी पुसून घेणे आधी घटना या सत्ताधारी पक्षांच्या गटातून होत असताना गृहमंत्री काहीच बोलत नाहीत किंवा कारवाई करीत नाहीत. यावरून कदाचित त्यांना तेच अपेक्षित असावे असे वाटते. त्यामुळे राज्यातील वातावरण असुरक्षित ठेवल्याने कोणीही गुंतवणूकदार राज्यात येणार नाही. परिणामी राज्याचे मोठे आर्थिक नुकसान तर होणारच पण महाराष्ट्राच्या नावालाही काळीमा लागेल हे लक्षात घ्यावे. यावरून गुन्हेगारांना बळ देऊन राजकारण केले जात असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे सत्तेतील नेतेच जर कायद्याला आव्हान देऊ लागले तर घर घर संविधान ही संकल्पनाच कुचकामी ठरेल. अलीकडे तर गुन्हेगारी कायदेही बदलल्याचे ढोल वाजवण्यात आले. तसेच लाडकी बहीणही आज सुरक्षित नाही. यातून सत्ताधाऱ्यांचे अपयश प्रकर्षाने झळाळून दिसते. परिणामी कायद्याचे राज्य राहिलेले नाही हेच खरे. मग महाराष्ट्रासाठी झटणे, बहुजनांसाठी राबणे, अथवा सामान्यांना भावने हे ढोंगच वाटणे स्वाभाविक आहे. सत्ताधारी फक्त नव नव्या संकल्पना राबवण्यात मग्न असल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचे दिवसागणिक धिंडवडे निघत आहेत.

**- पांडुरंग भाबल,भांडुप.**

## स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय धाडसी

महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणूका नोव्हेंबर मध्ये आहेत. राज्यातील मोठे राजकीय पक्ष निवडणूका एकतर आघाडी किंवा युती करुन सत्ता मिळविण्यासाठी प्रयत्नशील असतात. पण याला अपवाद ठरले आहे मनसे. मनसे पक्षाचे सर्वेसर्वा राजसाहेब ठाकरे यानी आगामी विधानसभा निवडणूका स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतलेला आहे. राज्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट,एनसीपी शरद पवार गट आणि काँग्रेस पक्ष इत्यादी दिग्गज राजकीय पक्ष सुध्दा स्वबळाचा नारा देत नाही अशावेळी मात्र एकमेव राजकीय पक्ष मनसे आहे ज्यांनी ठामपणे साधारणपणे दोनशे जागा स्वतंत्रपणे लढणार असल्याचे घोषणा केलेली आहे. त्यामुळेच एकंदरीत त्यांचा निर्णय हा कौतुकास्पद व धाडसी ठरलेला आहे.

**- सुनिल गंगाराम साळगांवकर, नेहरूनगर, मुंबई**

## टोलमाफी नेमकी किती दिवसांसाठी?

मुंबईत प्रवेश करताना उभारण्यात आलेल्या पाचही टोल नाक्यांवर हलक्या मोटर वाहनांना संपूर्ण टोल माफी करण्यात आली आहे. हा निर्णय निवडणुकीपुरता घेतलेला निर्णय नाही, याची खात्री सरकारने जनतेला द्यायला हवी. आचारसंहिता लागू होण्यापुर्वी हा निर्णय घेतल्याने वाहनचालकांना संयश येत आहे. टोलमाफी फक्त निवडणुकांपूरती नसावी.मुंबईतून बाहेर जाणा-या वाहनांना टोलमाफी का नाही? ही टोलमाफी कायमची असेल तर सरकारचे व आंदोलकांचे अभिनंदन करायला पाहिजे.टोलमाफी केल्याने मुंबईतल्या रस्त्यांची देखभाल होणार की नाही? रस्त्यांच्या देखभालीसाठी निधी कोठून आणणार? मुंबईतील पाच टोलनाक्यावरील टोलमाफीचा निर्णय घेतल्यानंतर राज्य सरकारला जवळपास पाच हजार कोटी रुपये संबंधित कंत्राटदाराना द्यावा लागणार आहे. मुंबईकरांना मिळणारा दिलासा राज्यातील इतर शहरांना देखील मिळावा.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

## धडाकेबाज निर्णय, अति घाई संकटात जाई असे होऊ नये !

लोकसभा निवडणुकीत महायुतीला फटका बसल्यानंतर महाराष्ट्र राज्य विधानसभा हातातून जाऊ नये म्हणून महायुती सरकारने लोकप्रिय योजना सुरु करण्याचा धडाका लावला आहे.आधीच महाराष्ट्र राज्यावर किती लाख कोटींचे कर्ज आहे हे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले आहे.एखादा नवीन उपक्रम सुरु करायचा असेल तर वार्षिक अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येते नंतर योजना जाहीर होते.महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून राज्यात एवढी सरकारे येऊन गेली. अनेक त्यांनी अनेक योजना आणल्या पण जाहिराती पासून लांब राहिले. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे.महायुती सरकारने ज्यास्तीत ज्यास्त मंत्रिमंडळ बैठका घेऊन नव नव्या घोषणांचा धडाका लावला आहे.ऑक्टोबर महिन्यातील पहिल्या दहा दिवसात चक्क १२९१ शासन निर्णय जारी केल्याचे आकडे समोर आले आहेत. मागील महिनाभरात चार मंत्रिमंडळ बैठकांमध्ये १३२ निर्णय घेतले आहेत. आधी लाडकी बहिण आली,मग भाऊ आला, मग तीर्थयात्रेला जाणारे लोक आले,एस. टी.गाडीतील मोफत प्रवास आला.अमृत योजना आली. गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पन्नासहून अधिक निर्णय घेण्यात आले.कोणतीही योजना जाहीर झाल्यावर ती अंमलात येणे,ती व्यवस्थित चालवणे ,त्याचा फायदा ज्या व्यक्तीसाठी ती योजना अंमलात आणली आहे त्यांना होतो आहे की नाही ते पाहणे आवश्यक आहे.महायुती सरकारच्या निर्णयाने राज्याचा विकास, राज्याची आर्थिक प्रगती पाहणे आवश्यक आहे.राज्यातील बेरोजगार कमी करण्यासाठी उद्योग आणण्याची गरज आहे.शिक्षण क्षेत्रात आमुलाग्र बदल करून सर्व घटकातील मुलांना मोफत शिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून दिले तर सरकारनेच नाव होईल.नाहीतर रस्त्यावर वाहतूक पोलिसांचे वाहन चालकांकरिता फलक असता.अति घाई संकटात जाई तसे होऊ नये.निवडणूकी नंतर जे कोणी सरकार येईल ते या नव्या योजना सुरु ठेवील की नाही हे सांगता येणार नाही.

**- महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई**

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा निर्णय राजकारणाशी जोडू नका

मराठी साहित्यात मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला त्यामुळे संपूर्ण राज्यात मराठी माणसांत आनंदाची लहर पसरलेली आहे. मराठी भाषेला संशोधनात्मक चांगले दिवस येतील यात शंका नाही. मराठी भाषेचा अभिजात दर्जा टिकवण्यासाठी मराठी माणूस म्हणून आपण मराठी भाषा वृध्दींगत करण्याची जबाबदारी आपल्यावर आली आहे, हा निवडणूक, राजकारण यांच्याशी संबंध जोडून नसत्या उठाठेवी करण्यापेक्षा त्यासाठी आपण आपल्या परीने काय करू शकतो, आणि कोणत्या प्रकाराने भाषेचे संवर्धन करू शकतो, आपल्या मराठी भाषेचा विकास होण्यासाठी आपण मराठी भाषिक म्हणून कोणत्या गोष्टी आमलात आणू शकतो..? यासाठी प्रत्येकाने विचार करणे गरजेचे आहे .

- प्रा.अलका सानप, मुंबई. ■

# बाल मजुरी विरोधात बालकांचा मोर्चा

**मुंबई :** दहा ऑक्टोबर या जागतिक बालकामगार निषेध दिनानिमित्त नॅशनल डोमेस्टिक वर्कर्स वेलफेअर ट्रस्ट तर्फे रविवार १३ ऑक्टोबर रोजी मुंबईत बाल कामगार आणि इतर मुलांचा एक भव्य मोर्चा काढण्यात आला. मुलांना बालमजुरीपासून दूर करून त्यांना शिक्षणाकडे नेणे, मुलांचे शोषण,बाल हक्कांचे उल्लंघन अशा अनेक समस्यांना आळा बसवून बालस्नेही आणि सुरक्षित समाज निर्माण करण्यासाठी ह दिवस पाळला जात असल्याचे मोर्चाचे समन्वयक आशिष शिगवण यांनी सांगितले. हा दिवस लक्षात घेऊन नॅशनल डोमेस्टिक वर्कर्स वेल्फेअर ट्रस्टतर्फे १३ ऑक्टोबर २०२४ रोजी गोरेगाव लिंक रोडवरून भगतसिंग नगर क्रमांक १, भगतसिंग नगर २ मार्गे गणेश मैदानापर्यंत ३०० मुलांचा जनजागृती मोर्चा काढण्यात आला. ज्यात अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव येथील विविध झोपडपट्ट्यांतील मुलांनी सहभाग घेतला आणि घोषणा दिल्या ' बंद करा, बंद करा, बालमजुरी बंद करा.



# मराठा आरक्षणाची सुनावणी सुरु असताना हे महाशय 'बिग बॉस'मध्ये बसलेत...

## उच्च न्यायालयाने याचिकाकर्ते ॲड. गुणरत्न सदावर्तेंना झापले



प्रतिनिधी
■ मुंबई

मराठा आरक्षाविरोधात दाखल याचिकांवर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. मराठा आरक्षणाविरोधात याचिका दाखल करणाऱ्या सर्व याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद पूर्ण झाला आहे. पुढील सुनावणीत राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता डॉ. बीरेंद्र सराफ अंतिम युक्तिवाद करणार आहेत.

या सुनावणीदरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने ॲड. गुणरत्न सदावर्तेंना मराठा आरक्षणाची सुनावणी सुरू असताना हे महाशय 'बिग बॉस'मध्ये जाऊन बसलेत', अशा कडक शब्दांत झापले. कोर्टाने सदावर्तेंच्या वर्तनावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

मराठा आरक्षणाविरोधातील याचिकांवर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली. मुंबई उच्च न्यायालयाच्या पूर्णपीठासमोर ही सुनावणी झाली. या सुनावणीदरम्यान, मुंबई हायकोर्टाने गैरहजर ॲड. गुणरत्न सदावर्ते यांना झापल्याची माहिती हाती आली आहे.आता यापुढे या प्रकरणी विरोध करणाऱ्या कुणाही याचिकाकर्त्याला युक्तिवाद करता येणार नाही असेही न्यायालयाने बजावले.'

राज्य मंत्रिमंडळाच्या शेवटच्या बैठकीतही मराठा आरक्षणावर कोणताही निर्णय घेण्यात आला नाही. या आचारसंहितेआधी राज्य मंत्रिमंडळात मराठा आरक्षणावर निर्णय घ्या, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांना सरकारला दिला होता. येत्या दोन दिवसात आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. मात्र आता मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### *मराठा आरक्षण आणखी लांबणीवर? पुरावे सादर करण्यासाठी पुन्हा मुदतवाढ*

*'मराठा आरक्षणाची इतकी महत्त्वपूर्ण सुनावणी सुरू असताना गुणरत्न सदावर्ते बिग बॉसमध्ये जाऊन बसले आहेत, अशी माहिती इतर वकिलांकडून हायकोर्टाला मिळाली. मराठा आरक्षणावरील प्रकरणातील मूळ याचिकाकर्त्यांना याचं गांभीर्य नाही का? आपली याचिका सर्वात आधी घ्या, अशी विनंती गुणरत्न सदावर्ते करत होते. आता युक्तिवाद करण्याची वेळ आली तर तेच गायब झाले? असा सवाल हायकोर्टाने केला. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या सर्व याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद संपला. आता कुणालाही युक्तिवाद करण्याची संधी मिळणार नाही, असेही हायकोर्टाने नमूद केले. मराठा आरक्षणावरील या सुनावणीत राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता डॉ. बीरेंद्र सराफ युक्तिवाद करणार आहेत. मराठा आरक्षणासंदर्भातील प्रकरणाची हायकोर्टातील पूर्णपीठापुढील सुनावणी 19 नोव्हेंबरपर्यंत तहकूब करण्यात आली आहे. आता पुढील सुनावणीत कोर्टात काय युक्तिवाद होणार, याकडे साऱ्यांचे लक्ष असणार आहे.*

# निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शकपणे पार पाडण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांची

## एस. चोक्कलिंगम यांचे प्रतिपादन



प्रतिनिधी
■ मुंबई

निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शकपणे पार पाडून लोकशाही अधिक बळकट करण्याची जबाबदारी निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर असते. त्यामुळे, आगामी विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया अत्यंत निकोप आणि सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी केले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई (मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हा) कार्यक्षेत्रातील विधानसभा मतदारसंघांमध्ये करण्यात आलेल्या पूर्वतयारींचा मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम आणि जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त श्री. भूषण गगराणी यांनी संयुक्तपणे बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात काल आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते.

अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. (श्रीमती) अश्विनी जोशी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) . अभिजीत बांगर, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई उपनगर जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी तथा मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, राज्याचे अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी किरण कुलकर्णी, सह मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. विजय राठोड, तसेच अन्य संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# धारावीत 'युवा संवादा'ची मुहूर्तमेढ

## युवकांच्या सशक्तीकरणासाठी धारावी सोशल मिशनचा अनोखा उपक्रम

प्रतिनिधी
■ मुंबई

कौशल्य विकासासह इतर आघाड्यांवर धारावीकरांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून त्यांच्या जीवनमानाचा दर्जा वाढविण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'धारावी सोशल मिशन'च्या (डीएसएम) वतीने आता धारावीत ' युवा संवाद ' या अनोख्या उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली आहे. धारावीतील 18 ते 32 वयोगटातील तरुणांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा शुभारंभ नुकताच रोजी माटुंग्यातील कल्याण भवन सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला.

प्रशिक्षक आणि प्रेरणादायी वक्ते डॉ. मनोहर भोईर, सायबर गुन्हे आणि डिजिटल फॉरेन्सिक तज्ज्ञ डॉ. प्रशांत लोखंडे, युएनएच मॅनेजमेंट सर्व्हिसेसचे संचालक - मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रफुल्ल येरवणकर, हीप हॉप डान्सर श्री. आकाश धनकर यांसारख्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या शुभारंभाला उपस्थित राहून आपला पाठिंबा दर्शविला.

डीएसएम हा उपक्रम धारावी रिडेव्हलपमेंट प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड (डीआरपीपीएल) चा उपक्रम असून ' युवा संवाद ' च्या माध्यमातून शिक्षण, रोजगार आणि नव्या संधी यासंदर्भातील आव्हाने पेलण्यासाठी धारावीतील तरुणाईला पाठबळ दिले जाणार आहे. या उपक्रमातून धारावीतील तरुणांना कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी, करिअर मार्गदर्शन यांसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे.

### *युवा संवाद उपक्रम असा असेल*

- *रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण*
- *विविध क्षेत्रांतील मान्यवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन*
- *नोकरीसाठी उपयुक्त प्रशिक्षण*
- *स्वयंरोजगार, आर्थिक आणि डिजिटल साक्षरता याविषयी कार्यशाळांचे आयोजन*
- *तरुणांमध्ये आत्मविश्वास आणि नेतृत्व गुणांचा विकास करण्यासाठी विशेष करिअर मार्गदर्शन शिबिर*
- *स्वच्छता मोहीम, आरोग्य शिबीर यांसारख्या उपक्रमांतून सामाजिक जाबाबदारीची जाणीव*

# कर्नाक पुलाची तुळई रेल्वे भागावर 70 मीटर सरकविण्याचे काम पूर्ण



प्रतिनिधी
■ मुंबई

मशीद बंदर रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर असलेला व पी. डि'मेलो मार्गाला जोडणाऱ्या १५४ वर्ष जुन्या कर्नाक पुलाची बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पुनर्बांधणी सुरू आहे. या प्रकल्प अंतर्गत ५५० मेट्रिक टन वजनाची दक्षिण बाजूची लोखंडी तुळई (गर्डर) रेल्वे भागावर ७० मीटरपर्यंत सरकविण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेल्या 'ब्लॉक' नुसार, रविवारी मध्यरात्री १२.२५ ते पहाटे ५.४५ या दरम्यान आणि आज काल मध्यरात्री १२.३० ते ३.३० या कालावधीत लोखंडी तुळई यशस्वीपणे सरकविण्यात आली आहे.

ही महाकाय तुळई दक्षिण बाजूस सरकविण्याचे काम येत्या आठवड्यात पूर्ण होईल. तसेच, समांतरपणे पुलाच्या पश्चिमेकडील पोहोच मार्गाचे बांधकाम येत्या आठवड्यातच सुरू करण्यात येईल. पुलाची दुसरी तुळई स्थापित करण्याची कार्यवाही डिसेंबर २०२४ अखेरपर्यंत पूर्ण करण्याकामी प्रयत्न केला जाणार आहे. तुळई सरकविण्याची कार्यवाही तांत्रिकदृष्ट्या अतिशय आव्हानात्मक होते. त्यासाठी विशेष तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे. मध्य रेल्वे प्रशासनाच्या परवानगीनंतर व पुढील रेल्वे 'ब्लॉक' मिळाल्यानंतर तुळई स्थापित करण्याची कार्यवाही पूर्ण केली जाणार आहे. त्या दृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून मध्य रेल्वेसोबत समन्वय साधण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिकेच्या पूल विभागाने मध्य रेल्वे प्रशासनासह योग्य समन्वय साधून ही कार्यवाही पूर्ण केली आहे. प्रमुख अभियंता (पूल) उत्तम श्रोते, उपप्रमुख अभियंता (पूल) शहर राजेश मुळे यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी, कामगार यांनी योग्य नियोजन करून तुळई पुढे सरकविण्याची कार्यवाही पार पाडली.


## उल्हासनगर महानगर पालिका, उल्हासनगर
मालमत्ता कर विभाग

**ई-निविदासुचना क्र. १. वर्ष २०२४-२५**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कर वाढीसाठी Revenue Sharing Model अंतर्गत मालमत्तांचे GIS सर्वेक्षण प्रणालीचा वापर करणेकरिता इच्छुक अनुभवी कंपनी यांच्याकडून दि. १४/१०/२०२४ पासून ०४/११/२०२४ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत ई -टेंडर दोन लिफाफा पध्दतीने जहिर निविदा https://mahatender.gov.in अथवा https://umc.mahatender.gov.in या वेबसाईट वरुन मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा अनामत रक्कम (EMD) | निविदाफार्म शुल्क (Tender Form Fee) | निविदा कालावधी (Time Allotted for completion) |
|---|---|---|---|---|
| १ | GIS-Based Property Tax Assessment Survey for All Properties: New properties,change of use properties properties, additional construction in and un-authorized properties based on revenue generation | रु.३,००,०००/- | रु. १०,०००/- + १८% GST = रु. ११,८००/- | १८ महिने |

निविदेबाबत सविस्तर माहिती https://mahatender.gov.in अथवा https://umc.mahatender.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असुन सदर वेबसाईटवरुन ई-निविदा विक्री व स्विकृती करता येतील.

जा.क्र, उमपा / पीआरओ / ३९८/२०२४
दि : १४/१०/२०२४

सही/-
(निलम चंद्रकांत कदम)
कर निर्धारक व संकलक
उल्हासनगर महानगरपालिका


# महाविकास आघाडी अंतर्गत एकजूट अधिक मजबूत करण्याची आवश्यकता - माकप

**मुंबई:** बहुतांशी पूर्वानुमान व मतदानोत्तर चाचण्यांचे अंदाज फोल ठरवत हरियाणामध्ये कॉंग्रेस व मित्रपक्षांना अनपेक्षित पराभवाचा सामना करावा लागला आहे. महाराष्ट्रात होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर कॉंग्रेस आणि मित्रपक्षांचा झालेला पराजय ही चिंता वाढवणारी गोष्ट आहे. त्यामुळे महाविकास आघाडी अंतर्गत एकजूट अधिक मजबूत करण्याची आवश्यकता असल्याचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने म्हटले आहे. भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची संविधानविरोधी, लोकशाहीविरोधी व जनताविरोधी धोरणे रोखण्यासाठी महाराष्ट्रात महाविकास आघाडी स्थापन करून समविचारी पक्ष काम करत आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये या सर्व पक्षांमध्ये समन्वय साधला गेल्यामुळे व इंडिया आघाडीतील या सर्व घटक पक्षांच्या मागे डाव्या विचाराच्या विविध शेतकरी, कामगार, शेतमजूर संघटना, समविचारी विद्यार्थी, युवक व महिलांच्या संघटना, डावे विचारवंत, डावे व लोकशाहीवादी पक्ष तसेच अनेक स्वयंसेवी संघटना ठामपणाने उभ्या राहिल्यामुळेच लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला यश प्राप्त झाले आहे.


## पश्चिम रेल्वे
साहित्य व्यवस्थापन विभाग
**विविध साहित्याचा पुरवठा**
ई-प्रापन निविदा सूचना क्र. एस/५७/२०२४ दिनांक ११.१०.२०२४

| अनु.क्र. | लघु बाबीचे वर्णन | परिमाण | टी. ओ. डी. |
|---|---|---|---|
| ६७९ | न्यूरोसर्जरीकरिता ब्रेन एंडोस्कोपी सिस्टीम | २ नग | ०४-नोंव्हे-२४ |
| ६८० | हाय अँड अल्ट्रासोनोग्राफी युनिट | २ नग | ०४-नोंव्हे-२४ |
| ६८१ | टीआर/मोटर एअर फिल्टर | ७२०५ नग | १२-नोंव्हे-२४ |
| ६८२ | १ ईन १६ टर्नआऊट्सकरिता ११२०० मिमी ओव्हररायडिंग कर्व्ह स्वीचेस | ३० संच | १२-नोंव्हे-२४ |
| | **फेर लिलाव** | | |
| ५५ | कॉनटेक्ट वायर १०७ चौ.मिमी. | ९७०६० मी | ०७-नोंव्हे-२४ |
| ५६ | कॉपर कॅटनरी वायर ६५ चौ.मिमी. | १६२५०० मी | ११-नोंव्हे-२४ |

**ईरठे, खरेदी बंधने आणि तपशीलवार निविदा अटींकरिता कृपया www.ireps.gov.in आणि www.wr.indianrailways.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

0629

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly



## महानिर्मिती
## ई-निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती — महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**(०१) निविदा. क्रं ३०००० ५२३२३ सीएचपी यू-८ विषय :** डिजाइन, इंजीनीरिंग, मॅनूफक्चारिंग, सप्लाय ईरेक्षण अँड कमिशनिंग ऑफ इंटर कनेक्शन कंवेयर फ्रॉम यू-६/७ स्टॅक यार्ड टू कंवेयर २ए ऑफ सीएचपी-यू-८,२५० मे. वॅट, टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.५९८.२५/- लाख, **बयाना** : रु. ५०००००/- **(०२) निविदा. क्रं ३०००० ५२३१२ सीएचपी यू-८ विषय :** डिजाइन, मॅनूफक्चारिंग, सप्लाय ईरेक्षण अँड कमिशनिंग ऑफ लिंक कंवेयर फ्रॉम स्टॅक यार्ड टू कंवेयर ६ए/बी अॅट सीएचपी-यू-८,२५० मे. वॅट., टीपीएस परळी वै **अंदाजीत खर्च** रु.४२२.९२/- लाख, **बयाना :** रु. ४२६४२०/-(नॉन डीपीआर) सर्व निविदांसाठी: फि रु ११८०/- निविदा क्रमांकासाठी ०१ व ०२ साठी ऑनलाइन पद्धतीने निविदा विक्री सुरू होण्याचा/निविदा भरण्याचा अंतिम दिनांक: **१५.१०.२०२४ पासून ११:०० वाजता ते दिनांक: ०४.११.२०२४ ते १६:०० वाजता** निविदा स्वीकृती आणि उघडणे: **दिनांक ०५.११.२०२४ पर्यंत १२:०० पर्यंत** आणि **१५:०० तासापर्यंत. संपर्क व्यक्ती:** मुख्य अभियंता, टीपीएस परळी-वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या: https://eprocurement.mahagenco.in, SRM help dest Email ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक: ८४११९७१५२५.

**मुख्य अभियंता**



## महानिर्मिती — इ-निविदा सूचना
क्र.ना.औ.वि.कें/२०२४-२५/३६

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

| अ. क्र. | नविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३०००० ५२३८१ / बीएम | ना. औ.वि.के.एकलहरे संच ३ आणि ४ साठी एपीएच परफॉर्मन्स आणि डिडस्टींग प्रणाली पुरवणे आणि सुधारित करून निश्चित करणे. | १४९,१३,७५०/- / १,५२,७००/- |
| २. | ३०००० ५२३४५ / आय अँन्ड सी | ना.औ.वि.केंद्र येथे इलेक्ट्रोन्यूमॅटिक आय टू पी कन्व्हर्टरचा पुरवठा. (लघु निविदा) | ५,६५,५५०/- / ९,१५५/- |
| ३. | ३०००० ५२३८७ / टीएम | युनिट क्रमांक ३ ईएसपी कंट्रोल रूम एसी पॅकेज युनिटच्या अनिवार्य स्पेअर्सच्या पुरवठ्यासह दुरूस्ती / पूर्ण ओव्हरहॉलिंग. | १२,४७,६३२/- / १६,०००/- |
| ४. | ३०००० ५२३७२ / ओडीपी | डब्ल्युटीपी येथे क्लॅरिफायर एडब्ल्युआर, सेटलर, डोझिंग प्लॅटफॉर्म येथे सुरक्षा उपायांची तपासणी आणि दुरूस्तीचे काम. | ३१,४५,२४०/- / ३४,९६०/- |
| ५. | ३०००० ५२३६७ / सेफ्टी/एफएफ | नाशिक टिपीएस च्या कर्मचाऱ्यांसाठी गरम तेल/ स्टीम स्प्लॅश सूट / फायर प्रॉक्सिमिटी सूट/ संरक्षण किटची खरेदी | ३९,१०,०००/- / ४२,६००/- |
| ६. | ३०००० ५२३९३ / सिव्हिल | स्टेज २ येथिल बुस्टर पंप हाऊस ते वे ब्रिजपर्यंत कॉंक्रीट रस्त्याचे मजबूतीकरण व दुरूस्तीचे काम. | ४४,०७,४८३/- / ४७,५८०/- |
| ७. | ३०००० ५२३९८ / सिव्हिल | सिन्नर फाटा ते डर्क इंडिया गेट या क्रॉंकीट रस्त्याच फुटपाथ दुरूस्तीचे काम, शोल्डर कट आणि जॉइंट फिलिंगचे काम. | ८,५५,७५८/- / १२,०६०/- |

नविन विक्रेते / नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी. अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.

प्रत्येक निविदा किंमत: रु. ११८०/-, अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता, नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे



## मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ
म्हाडा MHADA

**निविदा सुचना (Re-Tender)**

कार्यकारी अभियंता ई-१ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या इमारतीच्या दुरूस्ती कामाकरीता म्हाडा/ मुं.म.पा./ सा.बां. विभाग/ कें.सा.बां.वि./ रेल्वे/ बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून खालील कामाच्या मोहरबंद बी-१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत ५०% सुरवातीस ५०% चाल | कोऱ्या निविदेची रक्कम (विना परतावा) (जीएसटी सह) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १. | ई-१ विभागातील इमारत क्र.३-३डी, चमार लेन, मोहम्मदी बिल्डींग, संत गाडगे महाराज मंडई, भायखळा, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे काम) | २२६५००/- | २२६५/- | २५००/- २५००/- | २३६/- | १५/१०/२०२४ ते २२/१०/२०२४ सकाळी ११ ते सायंकाळी १.०० | २३/१०/२०२४ ते २४/१०/२०२४ सकाळी ११ ते सायंकाळी १.०० | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |
| २. | ई-१ विभागातील इमारत क्र.४, आयशा मंजील, बेकर लेन, डिलीमा स्ट्रीट, मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे काम) | २२९३२८/- | २२९३/- | २५००/- २५००/- | २३६/- | | | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |
| ३. | ई-१ विभागातील इमारत क्र.७, गणी बिल्डींग, डोलकर स्ट्रीट, डिलीमा स्ट्रीट, माझगांव मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे काम) | २२९५५४/- | २२९५/- | २५००/- २५००/- | २३६/- | | | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |
| ४. | ई-१ विभागातील इमारत क्र.९, रुस्तम दारुवाला चाल, गणपावडर रोड, माझगांव मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे काम) | २३९२०२/- | २३९२/- | २५००/- २५००/- | २३६/- | | | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |
| ५. | ई-१ विभागातील इमारत क्र.१५, मनकाबाई चाल,२रा कोळीवाडा, माझगांव मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे काम) | २२७०६८/- | २२७१/- | २५००/- २५००/- | २३६/- | | | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |
| ६. | ई-१ विभागातील इमारत क्र.१५-१७, हाजी कासम चाल, डिलीमा स्ट्रीट, माझगांव मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे काम) | २२९३६७/- | २२९४/- | २५००/- २५००/- | २३६/- | | | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |
| ७. | ई-१ विभागातील इमारत क्र.१६-१९, ढोलकर स्ट्रीट, डॉकयार्ड रोड, माझगांव मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे काम) | २२९३७२/- | २२९४/- | २५००/- २५००/- | २३६/- | | | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |
| ८. | ई-१ विभागातील इमारत क्र.१९, कुलसुंबी बिल्डींग, हॉस्पीटल लेन, डिलीमा स्ट्रीट माइगांव मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे काम) | २२९६४२/- | २२९६/- | २५००/- २५००/- | २३६/- | | | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |
| ९. | ई-१ विभागातील इमारत क्र.२६, नारीयलवाडी. लकडावाला चाल, रे रोड माझगांव मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे काम) | २३२३८४/- | २३२४/- | २५००/- २५००/- | २३६/- | | | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |
| १०. | ई-१ विभागातील इमारत क्र.३७-सी, चौगुले हाऊस, डॉकयार्ड रोड, माझगांव मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे काम) | २२८४४७/- | २२८४/- | २५००/- २५००/- | २३६/- | | | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |
| ११. | ई-१ विभागातील इमारत क्र.३९. युसूफ बिल्डींग, नवा नगर, डॉकयार्ड रोड, माइगांव मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे काम) | २२६५४३/- | २२६५/- | २५००/- २५००/- | २३६/- | | | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |
| १२ | ई-१ विभागातील इमारत क्र.४२-बी, फ्रुटवाला १२. बिल्डींग, न.१, दानोजी कोंडदेव रोड, माझगांव मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे | २३१३८०/- | २३१४/- | २५००/- २५००/- | २३६/- | | | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |
| १३ | ई-१ विभागातील इमारत क्र. २७२-बी, संदुक मेंशन, गणपावडर रोड, माझगांव मुंबई या इमारतीची दुरुस्ती करणे. (आमदार निधीचे काम) | २२८६२९/- | २२८६/- | २५००/- २५००/- | २३६/- | | | ०८ महिने | वर्ग-९ व त्यावरील |

१. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युन्तम देकर सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम निविदा उघल्याचा दिनांकापासून ८ दिवसांच्या आत भरली नाहीतर द्वितीय नूनतम देकाराच्या निविदाकास लेखी विचारणा करुन त्यानी प्रथम न्यूनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असले तर त्याची निविदा मूंजर केली जाईल. अतिरिक्त सुरक्षा अनामत बाबत सविस्तर निविदा सुचना पहावी
२. कोऱ्या निविदा म्हाडा/ मुं.म.पा./ सा.बां. विभाग/ कें.सा.बां.वि./ रेल्वे/ बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
३. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी/निमसरकारी संस्थेमध्ये काळया यादीत नांव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील शपथपत्र सादर करावे.
४. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सादर करावे
५. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत/शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी, मुं. इ. दु. व पु. मंडळ यांच्या नांवावर द्यावी.
६. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता ई-१ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३ यांचेकडून रकाना क्र. ६ मध्ये विहीत केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे कोऱ्या निविदांची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकाना क्र. ७ प्रमाणे स्विकृती केली जाईल. तसेच स्विकृती केलेल्या मोहरबंद निविदा शक्य झाल्यास रकाना क्र. ७ मधील शेवटच्या दिवशी कार्यकारी अभियंता ई-१ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, यांच्या कार्यालयात संध्या. २.३० वा. नंतर उघडल्या जातील.
७. संयुक्त बोलीदाराची बोली स्विकारली जाणार नाही.
८. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे ठेवण्यांत येत आहे.
९. निविदा स्विकृतीच्या दिनांकाच्या शेवटच्या दिवसापासून ३ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीपर्यंत कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र ग्राह्य असले पाहिजे अन्यथा त्या कंत्राटदाराचा विचार केला जाणार नाही.
१०. भाडेकरु/रहिवाशी यांनी ना हरकत प्रमाणपत्राद्वारे संरचनात्मक दुरुस्तीसाठी किंवा पुनर्विकासासाठी प्रस्ताव दाखल केल्यास ठेकेदारास जरी देकारपत्र/आदेश देण्यात आले असतील तरी कुठल्याही नुकसानीबद्दल हक्क किंवा दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही.
११. मागविण्यात आलेली निविदा सन २०२०-२१ च्या एसएसआर वर आधारीत असून त्यामध्ये जीएसटी अंतर्भूत नाही. जी.एस.टी. ची अदायगी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल.
१२. जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे .

CPRO/A/1005

Follow us: @mhadaofficial

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

सही/-
कार्यकारी अभियंता ई-१ विभाग,
मुं. इ. दु. व पु. मंडळ, मुंबई

## शिवशक्ती, डॉ शिरोडकर महिलांच्या अंतिम फेरीत

**मुंबई :** इन्शोअर कोट, भारत पेट्रोलियम यांनी शिवनेरी सेवा मंडळाने आयोजित केलेल्या विशेष व्यावसायिक गटाच्या अंतिम फेरीत धडक दिली. महिला गटात अंतिम फेरी गाठण्याचा मान पुन्हा एकदा शिवशक्ती व डॉ. शिरोडकर यांनी मिळविला. दादर(पूर्व), शिंदेवाडी येथील भवानीमाता क्रीडांगणावर झालेल्या विशेष व्यावसायिक गटाच्या उपांत्य फेरीत इन्शोअर कोटने रिझर्व्ह बँकेचा प्रतिकार ३२-२३ असा मोडून काढला. महिलांच्या उपांत्य सामन्यात शिवशक्ती संघाने जिजामाता महिलांचा ४१-२१ असा पाडाव केला. पूर्ण डावात ३ लोण व ५बोनस गुण घेत शिवशक्तीने सामना एकतर्फी केला. पूजा यादव, प्राची भादवणकर यांच्या सर्वांगसुंदर खेळाला या विजयाचे श्रेय जाते. तन्वी कदमने दुसऱ्या डावात थोडाफार प्रतिकार केला. दुसऱ्या सामन्यात डॉ. शिरोडकरने श्री स्वामी समर्थचा ६१-२३ असा सहज पराभव केला. मेघा कदम, नेहा कदम यांच्या झंझावाती खेळाने पहिल्या डावात ३२-११ अशी आघाडी घेणाऱ्या शिरोडकरने उत्तरार्धातही खेळाचा तोच जोश कायम राखत गुणांचे अर्धशतक पार केले. स्वामी समर्थची साक्षी गिलबिले एकाकी लढली.


छायाचित्र : दिनेश घाडीगावकर

## आशियाई किक बॉक्सिंग स्पर्धेत देपीवलीचा अमन पवार रौप्यपदक विजेता




प्रतिनिधी
■ वसई

कंबोडियाच्या फेनॉन पेम येथे ६ ते १३ ऑक्टोबर २०२४ दरम्यान झालेल्या आशियाई किक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये वसई तालुक्यातील देपीवली गावचा खेळाडू अमन प्रमोद पवार याने रौप्यपदक मिळवत भारताचं नाव उंचावलं आहे. या स्पर्धेत आशियातील २३ देशांचे ४३२ खेळाडू सहभागी झाले होते. अमनच्या या यशामुळे त्याचं गाव आणि तालुक्यात मोठा आनंद आहे. स्थानिक आणि राष्ट्रीय पातळीवरील खेळाडूंनी त्याचं अभिनंदन केलं आहे.

यापूर्वी, २४ ते २८ जुलै २०२४ दरम्यान गोव्यात झालेल्या सीनियर्स व मास्टर्स राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेत अमनने सुवर्णपदक मिळवत राष्ट्रीय विजेतेपद मिळवलं होतं. या कामगिरीमुळे त्याची कंबोडियामधील आशियाई स्पर्धेसाठी निवड झाली होती. स्पर्धेपूर्वी अमनने पश्चिम बंगालमध्ये विशेष सराव केला होता, ज्यामुळे त्याने या आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत रौप्यपदक पटकावलं. वसई तालुक्यातील पहिला खेळाडू म्हणून त्याने आशियाई किक बॉक्सिंगमध्ये ही कामगिरी केली आहे. आशियाई स्तरावर चमकदार कामगिरी केल्यानंतर आता अमन जागतिक स्पर्धांमध्ये भारताचं प्रतिनिधित्व करण्यासाठी सज्ज आहे.

# सिद्धेश लाडच्या झुंझार अर्धशतकांनंतरही रणजी करंडक गतविजेत्या मुंबईचा पराभव

### बडोदा 84 धावांनी विजयी; भार्गव भट्ट यजमानांच्या विजयाचा शिल्पकार

वृत्तसंस्था
■ बडोदा

गतविजेत्या मुंबईला रणजी ट्रॉफीच्या चालू हंगामातील (२०२४-२५) पहिल्याच सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला. बडोद्याने मुंबईचा 84 धावांनी पराभव केला. कृणाल पांड्याच्या नेतृत्वाखाली बडोद्याने मुंबईला विजयासाठी 262 धावांचे लक्ष्य दिले होते. अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या मुंबईचा संघ 177 धावा करून सर्वबाद झाला. मुंबईने 2023-२०२४ची रणजी ट्रॉफी जिंकली आहे.सिद्धेश लाडची ५९ धावांच्या झुंजार अर्धशतकी खेळीही संघाचा पराभव टाळू शकली नाही.

तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना बडोद्याने पहिल्या डावात 290 धावा केल्या, प्रत्युत्तरात मुंबई संघ केवळ 214 धावा करू शकला. तर बडोद्याने दुसऱ्या डावात 185 धावा केल्या. अशाप्रकारे मुंबईला दुसऱ्या डावात विजयासाठी 262 धावा करायच्या होत्या.रणजी ट्रॉफी 2024-25 चा चालू हंगाम 11 ऑक्टोबरपासून सुरू झाला आहे. पहिल्या फेरीत 16 सामने खेळवले जाणार आहेत.

भार्गव भट्ट बडोद्याच्या विजयाचा नायक होता. दोन्ही डावात 10 बळी घेऊन हा डावखुरा फिरकीपटू सामनावीर ठरला. दुसऱ्या डावात त्याने 6 विकेट घेतल्या. दुसऱ्या डावात त्याने रहाणे, अय्यर आणि सिद्धेश लाड यांच्या महत्त्वपूर्ण विकेट घेतल्या. भार्गव भट्टने पहिल्या डावात 4 विकेट्स घेतल्या.






***सिद्धेश लाडची फिफ्टी कामी आली नाही***

*मुंबईला विजयासाठी 262 धावांचे लक्ष्य मिळाले. श्रेयस अय्यर 30 धावा करून बाद झाला तर रहाणे आणि पृथ्वी शॉट 12-12 धावा करून बाद झाले. सिद्धेश लाड (59) याने 137 धावांत 8 विकेट गमावलेल्या मुंबईला निश्चितपणे 177 धावांपर्यंत नेले. मात्र त्याची खेळी संघाला पराभवापासून वाचवू शकली नाही. मुंबईच्या संघात चार कसोटीपटू होते. या सामन्यात अजिंक्य रहाणे, श्रेयस अय्यर, पृथ्वी शॉ आणि शार्दुल ठाकूर हेही मुंबईकडून खेळले. बडोद्याकडे आंतरराष्ट्रीय अनुभव असलेला एकच क्रिकेटपटू (कृणाल पांड्या) होता. त्याने दुसऱ्या डावात 55 धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.*

## भारत - पाकिस्तान सामना 19 ऑक्टोबरला रंगणार

### इमर्जिंग आशिया चषकात तिलक वर्मा भारत-अ संघाचा कर्णधार



प्रतिनिधी
■ मुंबई

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना हा क्रीडा विश्वासाठी पर्वणीच असते. आता हा सामना लवकरच सर्वांना पाहता येणार आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना हा १९ ऑक्टोबरला रंगणार आहे. हा सामना नेमका किती वाजता सुरु होणार आणि सामन्याची सर्व माहिती आता समोर आली आहे. ही स्पर्धा टी २० स्वरुपात खेळवली जाणार आहे.भारतीय संघ इमर्जिंगआशिया चषक स्पर्धेत सहभागी होणार आहे. आशिया चषकाचे हे सर्व सामने ओमान येथे खेळवले जाणार आहेत. भारत आणि ओमान यांच्या वेळा वेगवेगळ्या आहेत. त्यामुळे भारतीय वेळेनुसार हा सामना सायंकाळी ७ वाजता सुरु होणार, याची माहिती आता समोर आली आहे.

भारतीय संघ यावेळी अ गटात आहे. भारताच्या गटामध्ये भारत, पाकिस्तान, ओमान आणि युएई हे संघ आहेत. भारताचा या स्पर्धेतील पहिला सामना पाकिस्ताबरोबर १९ ऑक्टोबरला खेळवला जाणार आहे. या सामन्यासाठीचा टॉस भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ६.३० वाजता होणार आहे. त्यानंतर अर्ध्या तासाने म्हणजेच संध्याकाळी ७.०० वाजता हा सामना सुरु होणार आहे. या सामन्यासाठी भारताचे कर्णधारपद मुंबई इंडियन्सचा खेळाडू तिलक वर्मा सांभाळणार आहे. भारताने या स्पर्धेसाठी आपला एमर्जिंग संघ पाठवण्याचे ठरवले आहे. त्यामुळे तिलक हा भारताचा कर्णधार असेल. या संघात अभिषेक वर्मा हा सलामीवीर असेल, त्याला आयुष बदोनीची साथ मिळू शकते. त्याचबरोबर या संघात राहुल चहर, आर. साई किशोर, नेहल वढेरा, अनुज रावतसारखे खेळाडू असणार आहेत. भारताचा अ संघ या स्पर्धेत उतरणार असून बाकीचे सर्व संघही नवीन आहेत. त्यामुळे भारताने या स्पर्धेसाठी एमर्जिंग संघ पाठण्याचा निर्णय घेतला आहे. भारताचे अन्य दोन सामने २१ आणि २३ ऑक्टोबरला खेळवले जाणार आहेत.

***भारत 'अ' संघ***

*तिलक वर्मा (कर्णधार), अभिषेक शर्मा, आयुष बदोनी, निशांत सिंधू, रमणदीप सिंग, अनुज रावत, प्रभसिमरन सिंग, नेहल वढेरा, अंशुल कंबोज, हृतिक शौकीन, आकिब खान, वैभव अरोरा, रसिक सलाम, आर. साई किशोर आणि राहुल चहर.*

## कॉमनवेल्थ पॉवरलिफ्टींग चॅम्पियनशिपमध्ये पुण्याच्या राऊत बहिण-भावाने पटकावले सुवर्णपदक

### कादंबरी राऊतचा स्कॉट प्रकारात जागतिक रेकॉर्ड

प्रतिनिधी
■ पुणे

दक्षिण आफ्रिकेतील सन सिटी येथे संपन्न झालेल्या कॉमनवेल्थ पॉवरलिफ्टींग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी हडपसरच्या कादंबरी व चिंतामणी राऊत या बहिण -भावाने सुवर्णपदक पटकावले.चिंतामणी हा विशेष मुलांच्या ९३ किलो वजन गटात भारताचे तर कादंबरी ही मुलीच्या सब ज्युनिअर ६९ किलो वजनी गटात देशाचे प्रतिनिधित्व केले.

दक्षिण आफ्रिकेतील सन सिटी येथे कॉमनवेल्थ पॉवरलिफ्टींग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी एकूण ९७ देश सहभागी झाले होते. भारतातून ६५ खेळाडू सहभागी होते. चिंतामणी बाळासाहेब राऊतने स्कॉट या प्रकारात १५० किलो बेंच प्रकारात ७० तर डेड या प्रकारात १८० किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले.



मागच्या वेळेस साऊथ आफ्रिकच्या चेअंते मलदेर हिने १४५ किलो उचलून जागतिक रेकॉर्ड केलेला.पण ह्यावेळी कादंबरी ने १५० वजन उचलून जागतिक रेकॉर्ड सिल्वर पदक मिळवले.ओव्हर ऑल खेळासाठी कादंबरीला एक सुवर्णपदक व तर तीन रौप्यपदके मिळाली आहेत. प्राचार्य संजय मोहिते, प्रशिक्षक टी. बाकी राज, महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संजय मोरे तसेच रवींद्र यादव आणि राजहंस मेहेंदळे व वडील बाळासाहेब राऊत यांचे ह्या दोघ्या बहिण भावांना मार्गदर्शन लाभले.

## कॅमेरुन ग्रीन बॉर्डर गावस्कर ट्रॉफीतून बाहेर

**मेलबर्न :** ऑस्ट्रेलियन अष्टपैलू कॅमेरून ग्रीन 22 नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमधून बाहेर पडला आहे. एवढेच नाही तर त्याला जानेवारी महिन्यात होणाऱ्या श्रीलंका दौऱ्यातून बाहेर पडावे लागू शकते. 25 वर्षीय ग्रीनच्या पाठीची सर्जरी होणार आहे. यामुळे त्याला किमान ६ महिने क्रिकेटपासून दूर राहावे लागणार आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने एक निवेदन जारी केले की, 'ग्रीनने पाठीवर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला आहे. कारण, त्याच्या स्कॅनमध्ये एक अनोखी समस्या आढळून आली आहे, जी त्याच्या पाठीची दुखापत वाढवत आहे. या शस्त्रक्रियेमुळे तो बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीचा भाग असणार नाही.यावेळी बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये ५ कसोटी सामने खेळवले जाणार आहेत. पहिला सामना 22 नोव्हेंबरपासून पर्थमध्ये सुरू होणार आहे. ग्रीनच्या वगळल्याने ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का बसला आहे कारण तो 5 व्या क्रमांकावर फलंदाजी करत आहे. गोलंदाजीही करतो. ग्रीनच्या अनुपस्थितीत, स्टीव्ह स्मिथला पुन्हा एकदा त्याच्या नियमित क्रमांक-4 वर फलंदाजी करावी लागेल. त्याचबरोबर उस्मान ख्वाजाचा सलामीचा जोडीदार म्हणून निवडकर्त्यांना दुसरा चेहरा शोधावा लागू शकतो.

## डायलेसीस सेंटर सुरु करण्यासाठी ई विभागात जागा उपलब्ध करुन द्या

### जीवन प्रबोधिनी ट्रस्टची पालिका आयुक्तांकडे मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई 'ई' विभाग क्षेत्रात डायलेसीस सेंटर सुरु करण्यासाठी जागा उपलब्ध करून द्या अशी मागणी जीवन प्रबोधिनी ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष सत्यवान नर यांनी लेखी पत्राद्वारे महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेऊन केली. यावेळी सोबत संस्थेचे सल्लागार आमदार विजय (भाई) गिरकर, सह आयुक्त चंद्रशेखर चौरे, मयूर देवळेकर, ट्रस्टचे सल्लागार सुनिल मांजरेकर हे देखील उपस्थित होते.



जीवन प्रबोधिनी ट्रस्ट गेली १५ वर्षे मुंबई व ग्रामीण क्षेत्रात आरोग्य क्षेत्रात कार्यरत असून आरोग्य क्षेत्राशी निगडीत अनेक उपक्रम, शिबिरे राबवत असते. सध्या किडनी व मूत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घेणे खर्चिक असल्याने अनेक रुग्ण दगावण्याच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. तर शहरात सध्या पन्नास ते साठ हजार व्यक्तींना डायलिसिसची गरज असल्याचं या क्षेत्रात काम करणारे तज्ज्ञ सांगतात. मात्र मुंबई उपलब्ध असलेली डायलेसीस सेंटर अपुरी पडताना दिसत आहेत. तसेच खाजगी डायलेसीस सेंटर मधील उपचार गरीब रुग्णांना परवडत नाहीत. म्हणून संस्थेने डायलिसिस सेंटर सुरू करण्याची मागणी केली आहे.

## महिला व बालकांसाठी कांजूरमार्ग येथील रूग्णालयाचे मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

### ९० रूग्णशय्या क्षमतेच्या सहा मजली रूग्णालयाची उभारणी

प्रतिनिधी
■ मुंबई

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून पूर्व उपनगरातील विक्रोळी, कांजूरमार्ग, भांडूप परिसरातील महिला व बालकांसाठी स्पेशालिटी रूग्णालयाचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कांजूरमार्ग (पूर्व) येथे रविवारी पार पडले. या अद्ययावत रूग्णालयाच्या रुपाने एस विभागातील नागरिकांना आपल्या घरानजीक विविध स्वरूपाच्या मोफत वैद्यकीय सुविधा देणाऱ्या ूग्णालयाचा पर्याय उपलब्ध होणार आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी सांगितले. खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार मंगेश सांगळे यांच्यासह विविध मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती.



बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांना मोफत वैद्यकीय सुविधेसाठी सुमारे २५० हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्यात आले आहेत. महानगरपालिकेच्या मोठ्या रूग्णालयांच्या ठिकाणी मोफत आणि कॅशलेस असे वैद्यकीय उपचार देण्यासाठी झिरो प्रिस्क्रीप्शन धोरण राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे वैद्यकीय सुविधेत रूग्णांना औषधांची खरेदी करण्याची गरज भासणार नाही. रुग्ण सेवा हे प्रथम कर्तव्य मानून शासनाने वेगवेगळ्या योजना अंमलात आणल्या आहेत, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी नमूद केले.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एस विभाग अंतर्गत कांजूरमार्ग (पूर्व) (कांजूर गाव) येथे माता व बालकांसाठी सहा मजली स्पेशालिटी रूग्णालय उभारण्यात येणार आहे. एकूण ९० रूग्णशय्या क्षमतेचे हे रूग्णालय असणार आहे. इमारतीचा बांधकाम पूर्ण करण्याचा नियोजित कालावधी ३३ महिने इतका आहे.

आय. व्ही.एफ प्रयोगशाळा, निदान विभाग, बाह्य रूग्ण विभाग, शस्त्रक्रियागृह, प्रसुति विभाग (०२), बाल / शिशु चिकित्सा विभाग, वैद्यकीय विभाग, शस्त्रक्रिया पूर्व निरीक्षणालय विभाग, शस्त्रक्रिया पश्चात निरीक्षणालय, शस्त्रक्रियागृह (५), प्रतीक्षालय अशा प्रकारची या इमारतीत विभाग रचना असेल.

विक्रोळी, कांजूरमार्ग, भांडूप परिसरातील नागरिकांकडून या रूग्णालयाची मागणी होत होती. या मागणीच्या पूर्ततेमुळे गरोदर स्त्रियांना प्रसूतिसाठी अद्यावत सुविधेचे रूग्णालय उपलब्ध होईल. तसेच बालकांसाठीही बाह्यरुग्ण विभागाच्या माध्यमातून वैद्यकीय उपचार उपलब्ध होणार आहेत. तसेच स्पेशालिटी रूग्णालय अंतर्गत नवजात बालकांसाठी (एनआयसीयू) ची सुविधा मिळणार आहे.

## 'लाल परी'च्या प्रवाशांना दिलासा; एसटीने जाहीर केलेली 10 टक्के हंगामी भाडेवाढ रद्द

प्रतिनिधी
■ मुंबई

एसटी महामंडळाकडून दर वर्षी दिवाळीत १० टक्के भाडेवाढ केली जाते. मात्र, प्रवाशांची गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. महामंडळाने जाहीर केलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. यंदा देखील २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर दरम्यान एका महिन्यासाठी महामंडळाने एसटीची भाडेवाढ लागू केली होती. मात्र, विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर ही भाडेवाढ रद्द करण्यात आली आहे. महामंडळाने भाडेवाढ रद्द करत एसटीच्या प्रवाशांना दिलासा दिला आहे. राज्यभरातील प्रवाशांना या निर्णयामुळे फायदा होणार आहे.

दिवाळीत केली जाणारी हंगामी भाडेवाढ रद्द केल्यामुळे एसटी महामंडळाला मिळणारी अतिरिक्त रक्कम यंदा मिळणार नाही. मात्र, या निर्णयाचा प्रवाशांना फायदा होणार आहे. या भाडेवाढीमुळे एसटीचा लांब पल्ल्याचा प्रवास महागणार होता. परंतु, आता एसटीच्या तिकीटाचे दर 'जैसे थे' अवस्थेत राहतील.



***एका महिन्यात ९५० ते १००० कोटींच्या उत्पन्नाची होती अपेक्षा***

*एसटी महामंडळाला सध्या दिवसाला सुमारे २२ ते २५ कोटी रुपयांचे तर महिन्याला ८५० कोटींच्या आसपास उत्पन्न मिळते. हंगामी भाडेवाढनंतर दिवसाला ६ कोटी रुपयांचे उत्पन्न वाढण्याची शक्यता होती. तर हंगामी भाडेवाढीच्या महिभरात एसटी महामंडळाला ९५० ते १००० कोटींचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा होती. यामुळे हंगामी भाडेवाढीचा निर्णय रद्द केल्याने सणासुदीच्या दिवसात महामंडळाच्या तिजोरीत अतिरिक्त रक्कम जमा होणार नाही.*

## कवी अनंत धनसरे यांच्या 'एक सत्य' दीर्घ कवितेचे शनिवारी प्रकाशन

प्रतिनिधी
■ मुंबई

कवी अनंत धनसरे यांच्या"शोध" कविता संग्रहा नंतर " एक सत्य" दीर्घ कविता या नव्या पुस्तकाचे प्रकाशन घाटकोपर येथील माता रमाबाई आंबेडकर नगर, शहिद स्मारक हॉल येथे जेष्ठ साहित्यिक शिवा इंगोले यांच्या हस्ते आणि अध्यक्षतेखाली शनिवारी संध्या. ४ ते ७ या वेळेत संपन्न होणार आहे.

सदर प्रकाशन समारंभास प्रमुख वक्ते म्हणून जेष्ठ समिक्षक प्रा. डॉ शामला गरुड, प्रा. डॉ. अविनाश कोल्हे, प्रा. डॉ. सुनील पवार, प्रा. दिलीपकुमार कांबळे आणि शहिद स्मारक सभागृहाचे उपाध्यक्ष मंगेशभाऊ पगारे उपस्थित राहणार असून प्रास्ताविक जीवन भालेराव आणि सुत्रसंचालन दादासाहेब यादव करणार आहेत. मराठीतील अनेक प्रसिद्ध साहित्यिकांनी गौरविलेल्या या पुस्तकाला वाचक रसिकांकडून मोठ्या प्रमाणात मागणी होत असून महिन्याभरात प्रकाशन पूर्व शंभराहून अधिक प्रति विकल्या गेल्या आहेत.

शहिद स्मारक समितीचे अध्यक्ष अशोकभाऊ हिरे, कवी सतिश धिवर, साहित्यिक अरूण वाघ, माजी नगरसेवक उदयराज तोरणे, सुनील मोहन शिरसाट आदी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

## सर्व राजकीय पक्षांकडून बौद्ध आणि अनुसूचित जातीच्या मतदारांची फसवणूक - सुनील गमरे

प्रतिनिधी
■ मुंबई

बौद्ध समाजातील बौद्धजन पंचायत समिती, भारतीय बौद्ध महासभा व अन्य धार्मिक संघटना धार्मिक कामे करता करता राजकीय पक्षाशी एकरूप होऊन कार्यरत आहेत. मात्र या संघटनांचा राजकीय पक्ष वेगवेगळी अमिषे दाखवून नुसता वापर करीत आहेत तसेच सर्व राजकीय पक्षांनी बौद्ध आणि अनुसूचित जातीच्या मतदारांची फसवणूक केली आहे असा आरोप बौद्धजन पंचायत समितीचे विश्वस्त आणि मालाडमधील जेष्ठ सामाजिक कार्यकर्त सुनील गमरे यांनी केला आहे.

लोकशाहीत सर्व प्रवर्गांना राजकीय प्रतिनिधित्व मिळावे व सर्व स्तरातील लोकांना त्यांचा फायदा व्हावा, अशी अपेक्षा लोकशाहीत करणे अयोग्य ठरणार नाही. आज आपल्या देशात लोकसभा किंवा विधानसभा असो काही ठरलेल्या लोकांना उमेदवारांची मक्तेदारी मिळते. स्वातंत्र्यानंतर काही मोजके विभाग सोडता सगळीकडे मागासवर्गीयांचे निवडणुकीला उभे राहण्याचे दरवाजे बंद आहेत. असे अनेक वर्षांच्या अनुभवाने सिद्ध झाले आहे.

उत्तर मुंबईतील मालाड पश्चिम विधानसभा १६२ विधानसभा क्षेत्रात मोठ्या संख्येने बौद्ध आणि अनुसूचित जातीचे लोक राहतात. भारतरत्न डॉ. बाबासाहेबांना मानणारे एस सी प्रवर्गातील मतदार एक लाखापेक्षा जास्त आहेत. तरी स्वातंत्र्य काळापासून आजपर्यंत या मतदार संघात बौद्ध किंवा इतर मागासवर्गीय समाजातील उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राजकीय पक्षांनी उभे केलेच नाहीत. त्यांना उमेदवारीच दिली गेली नाही. या मतदारसंघात चंद्रकांत गोसालीया (काँग्रेस) १० वर्ष, माधव मराठे (भाजप) ५ वर्ष, पी.यू. मेहता (काँग्रेस) १० वर्ष, अस्लम शेख (काँग्रेस) १५ वर्ष सदर मतदार संघाचे आमदार म्हणून प्रतिनिधित्व करत होते आणि आहेत. तसेच खासदार म्हणून अनुपचंद शाह (काँग्रेस), राम नाईक (भाजपा), गोविंदा आहुजा (काँग्रेस), संजय निरुपम (काँग्रेस) ,गोपाळ शेट्टी (भाजप) आणि आताचे विद्यमान पियुष गोयल (भाजप) हे प्रतिनिधित्व करत होते आणि आहेत, अशी माहिती सुनील गमरे यांनी दिली.

राजकारण कसे करावे याबाबत त्यांनी वेळोवेळी बहुजन समाजाला मार्गदर्शन केले मात्र बाबासाहेबांच्या विचारांना बगल देऊन आज हा समाज सत्ताधाऱ्यांच्या सोयीनुसार व त्यांच्या मर्जीनुसार विभागला गेला आहे. तो समाज एकवटला गेला तर बऱ्यापैकी आमदार निवडून येऊ शकतात. डॉ बाबासाहेबांना मानणाऱ्या बहुजन समाजातील जनतेने आता लक्षात ठेवून सर्व मतभेद विसरून एक झाले पाहिजे तरच बाबासाहेबांच्या स्वप्नातील समृद्ध आणि समता मुलक समाज घडेल. असे अनेक बहुजन कार्यकर्त्यांचे मत आहे.

वरं जनहितं ध्येयम्
(पुणे महानगरपालिका)

## पुणे महानगरपालिका, पुणे

जाहिरात क्र.३/५२५
दि. १५/१०/२४

**माहिती व तंत्रज्ञान विभाग**
शुद्धीपत्रक

विक्री कालावधी दिनांक :- 15/10/2024 ते दि. 21/10/2024 दुपारी २.३० पर्यंत
स्विकृती दिनांक :- 15/10/2024 ते दि. 21/10/2024 दुपारी २.३० पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : 22/10/2024 3.00 वा.

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किमंत रु. | अंदाजित पूर्वगणन रक्कम रु | बयाणा रक्कम रु | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/11/2024/09 | माहिती व तंत्रज्ञान विभाग | Selection of Service provider for Supply, Installation, Testing and Commissioning Operation and Maintenance of Network Infrastructure in 34 Villages and other 16 locations of PMC for a period of 5 years. | 17,879 | B 2 पध्दत | 5,50,000 | 5 वर्ष | श्री प्रदिम प्रभाकर रसाळ, संगणक प्रोग्रॅमर मो.नं. ९६८९९३१५१० |

अ) पुणे म.न.पा. ची वरीत कामे ही अनुभवी / म.न.पा. मान्यता प्राप्त / शासन मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून (कामासाठीच्या पूर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमूद केल्यानुसार करून घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामांबाबत निविदा अटी शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
(ड) ऑनलाईन निविदा प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती/प्रशिक्षण माहिती व तंत्रज्ञान विभाग, पुणे म.न. पा. येथे मिळेल.
इ) कार्यालयीन आदेश क्र. अतिमवि३/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम इ.सी. एस. आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्विकारण्यात येणार आहे.

जावक क्र. : मावजसंका / ११२८
दिनांक : १४/१०/२०२४

(स्वाक्षरी-/)
संगणक प्रोग्रॅमर
माहिती तंत्रज्ञान विभाग
पुणे महानगरपालिका

(स्वाक्षरी-/)
सिस्टिम मॅनेजर
माहिती तंत्रज्ञान विभाग
पुणे महानगरपालिका

(स्वाक्षरी-/)
उपआयुक्त
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पुणे महानगरपालिका

## महानगरपालिका कर्मचाऱ्यांना 17 हजारांचा बोनस जाहीर

**उल्हासनगर :** आयुक्त विकास ढाकणे, यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका अधिकारी कर्मचारी यांना बोनस देणे संदर्भात बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त, जमिर लेंगेरेकर, मुख्य लेखा अधिकारी, किरण भिलारे, मुख्य लेखा परिक्षक, शरद देशमुख, जनसंपर्क अधिकारी, छाया डांगळे, लेबर फ्रन्ट यूनियनचे श्याम गायकवाड व दिपक दाभणे, अखिल भारतीय सफाई मजदुर कामगार युनियनचे चरणसिंग टाक व आसाराम टाक, भारतीय कामगार संघटनेचे राधाकृष्ण साठे, मनसेचे दिलीप थोरात तसेच इतर प्रतिनिधी व कर्मचारी उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये मा. प्रशासक तथा आयुक्त विकास ढाकणे यांनी महापालिका अधिकारी /कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रुपये १७०००/- (सतरा हजार रूपये मात्र) सानुगृह अनुदान म्हणून सर्वानुमते देण्याचे मंजूर कले,




## रिक्षा कठड्याला धडकल्याने माय- लेकाचा मृत्यू

■ पुणे

पुण्याच्या राजगड तालुक्यातील रांजणे गावच्या हद्दीत रिक्षाचा भीषण अपघात झाला. तालुक्यात रात्रीच्या सुमारास वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसाने रस्त्यावर झाड पडले होते. रस्त्यामध्ये अचानक झाड पडलेले दिसल्याने चालकाचे नियंत्रण सुटून रिक्षा कठड्याला धडकली. या भयंकर अपघातात माय-लेकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. पुण्याच्या राजगड तालुक्यातील रांजणे गावच्या हद्दीत झालेल्या रिक्षा अपघातात मायलेकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. संबंधित रिक्षा पाबे घाट मार्गे पुण्याच्या दिशेने जात असताना अचानक पुढं झाडं पडलेले दिसल्यानं चालकाचे नियंत्रण सुटले.

# महाराष्ट्रात सत्तापरिवर्तनासाठी मनोज जरांगेंचा MMD फॉर्म्युला

प्रतिनिधी
■ जालना

नारायण गडाचा दसरा मेळावा बघून त्यांचे डोळे उघडले असतील. मराठा आरक्षणाच्या सर्व मागण्यांची अंमलबजावणी होणार आहे. त्यामुळे मराठ्यांना आरक्षण देणे सरकारला भाग आहे.त्याशिवाय आचारसंहिता जाहीरच होणार नाही असे मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. ते पुढे म्हणाले की आजच्याच दिवशी करोडो समाज अंतरवालीत जमला होता, आजच्याच दिवशी आपल्या लेकरांसाठी, शेतकरी आणि ओबीसीसाठी उठाव झाला होता. समाज खुप लढला आहे आणि त्याचे मी चीज करणार आणि मराठा समाजाचे योगदान वाया जाऊ देणार नाही असेही जरांगे पाटील यावेळी म्हणाले. मराठा समाज त्यांच्या पाठीशी होता. पण आता मुसलमान, दलित, गोरगरीब, ओबीसी विरोधात आहेत. त्यांच्याविरोधात साडेतीन कोटी समाज गेला आहे असे जरांगे पाटील यावेळी म्हणाले.



जरांगे पुढे म्हणाले की ज्यांची मागणी नाही त्या पंधरा जातींना मराठ्यांच्या नाकावर टिचून आरक्षण दिले आहे.आमच्या 57 लाख नोंदी असून आरक्षण देत नाहीत. देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा सांगतो आम्हाला राजकारण करायचे नाही, तुमच्या खुर्च्या तुम्हीच सांभाळा, तुमची मजा तुम्हीच करा, मराठ्यांच्या विरोधात फडवणीस यांनी जाऊ नये, नाहीतर मराठा समाज तुम्हाला अस्मान दाखवल्या शिवाय राहणार नाही असेही जरांगे यांनी यावेळी सांगितले. प्रकाश आंबेडकर यांनी वंचितचे आमदार निवडून द्यावे अशी विनंती जरांगे यांना केली आहे. त्याविषयी विचारले असता त्यांनी त्यावर चर्चा होईल.ते येतील, आम्ही त्यांचा कधीही सन्मानच केला आहे. समाज आणि प्रकाश आंबेडकर यांच्याशी चर्चा करतील. आम्ही त्यांना कधीच डावलले नाही, सर्व सामान्य दलित, ओबीसी, मराठा, मुस्लिम यांना वाटते की आता या लाटेत आपण एकजूट राहिले पाहिजे,तरच शंभर टक्के गरीबांची सत्ता येऊ शकते आणि प्रकाश आंबेडकर यांनी वंचित आणि गरीबांच्या बाजूने राहिले पाहिजे असेही ते म्हणाले.

येत्या निवडणूकीत उमेदवार उभे करणार का ? यावर ते म्हणाले की त्यांचे एकदा होऊ द्या,त्यांच्या याद्या येऊ द्या, त्या याद्या कशा आहेत बघु द्या.त्यानंतर आम्ही काय तो निर्णय घेणार. त्यांना मागे सरकता नाही आले पाहिजे, गेमच टाकणार असेही मनोज जरांगे यांनी सांगितले. मुंबईतील पाच टोल नाक्यांवर टोलमाफी झाली आहे यावर विचारले असता त्यांना काय मुबाईतील लोकच मतदान करतात का..? महाराष्ट्रामधील लोक त्यांना मतदान करत नाहीत का..? सर्वच टोल नाके सर्वच फ्री करू गोरगरीबांचे कल्याण होऊ द्या अशीही मनोज जरांगे यांनी केली.

## नागपुरात चार विद्यार्थ्यांचा कालव्यात बुडून मृत्यू

■ नागपूर

नागपुरातून धक्कादायक घटना समोर आली आहे. नागपूरमधील ४ शालेय विद्यार्थी मोठ्या कालव्यात बुडाल्याची घटना घडली आहे. चार विद्यार्थ्यांच्या मृत्यूने त्यांच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील घोटीटोक परिसरातील ४ शालेय विद्यार्थ्यांचा कालव्यातून बुडून मृत्यू झाला आहे. सर्व विद्यार्थी इयत्ता सातवी ते अकराव्या वर्गातील असून इंदिरा गांधी मुलांचे वस्तीगृहाचे विद्यार्थी आहेत. कालव्यात पोहोयला गेले असता ही दुर्घटना घडली आहे. घटनास्थळी पोलीस आणि तहसीलदार पोहचले असून शोधकार्य सुरू करण्यात आले आहे. या चार जणांचे मृतदेह शोधण्याचे कार्य सुरु आहे. नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यात बोरी गावाजवळ चार शाळकरी मुलं कालव्यात बुडाली आहेत.

## रायगड, ठाण्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यात मुसळधार पाऊस

प्रतिनिधी
■ ठाणे



राज्यातील अनेक जिल्ह्यात परतीने पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. रायगड, ठाणे, वर्धा आणि बुलढाण्यासह अनेक जिल्ह्यात मुसळधार पावसाने हजेरी लावलीये. रायगडमध्ये पुन्हा परतीच्या मुसळधार पावसाला सुरुवात झालेली पाहायला मिळाली. सलग चार दिवसांपासून परतीच्या पावसाचा रायगडमध्ये धुमाकूळ घातलाय. रायगड जिल्ह्यातील माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, इंदापूर, रोहा परिसरात पाऊस जोरदार बरसलाय. त्यामुळे नागरिकांची अक्षरक्ष: तारांबळ उडाली आहे.

कल्याण डोंबिवली परिसरामध्ये परतीच्या पावसाचे आगमन गेल्या अर्ध्या तासापासून पाऊस कोसळत आहे. मेघ गर्जना सह विजेच्या कडकटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली असून परिसरामध्ये काळोख पसरला आहे.

वर्ध्यात सोयाबीनचे पीक घरी घेऊन जात असताना शेतकऱ्यांचा ट्रॅक्टर सोयाबीनसह पुरात वाहून गेलाय. वर्ध्यातील आष्टी तालुक्याच्या शिरकुटणी येथे घटना घडलीये. वर्ध्याच्या आष्टी तालुक्यातील शिरकुटणी या गावातील शेतकरी पुरुषोत्तम नागदेवते याने आपल्या सोयाबीनचे पीक काढले. ते पीक घरी घेऊन जात असताना अचानक आलेल्या पावसाने नाल्याला मोठा पूर आला. या पुरात ट्रॅक्टर सह सोयाबीनचे 40 पोते वाहून गेले आहे. सोयाबीनचे पोते पुलात पडल्याने शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. बुलढाणा जिल्यात परतीच्या पावसाने थैमान घातलय. मलकापूर शहरातील सखल भागात पुराच पाणी शिरल्याने अनेक भागातील रस्ते पाण्याखाली गेले आहेत. मलकापूर , दाताळा परिसरात जनजीवन विस्कळीत झाले आहे. बुऱ्हाणपूर - जालना मार्ग ठप्प गेल्या तीन तासांपासून ठप्प पडलाय.

# थकीत मालमत्ता कर भरा आणि जप्ती-लिलाव टाळा !

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियातील १२९ नुसार शहरातील जमिनी व इमारती या कर आकारणी पात्र आहेत. शहरातील सर्व प्रकारच्या मिळकतीवर कर आकारणे हा महापालिकेस कायदयाने दिलेला अधिकार आहे. त्यानुसार, महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतधारकांना मालमत्ता कराची देयके वितरीत केली जातात.

महानगरपालिकेच्या कर विभागाकडून करवसुलीचे उददीष्ट साध्य करण्यासाठी विविध प्रकारे प्रयत्न केले जात असून, त्यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. तथापी, मालमत्ता कर थकवणा-या व दिलेल्या मुदतीत करभरणा न करणा-या मालमत्ताधारकांविरुध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कर वसुलीची मोहिम तीव्र करण्यात आली आहे. कर विभागाकडून जप्तीपुर्व नोटीस बजाविण्यात येत असून, दिलेल्या मुदतीत कर भरणा न केल्यास मालमत्ता अटकावणीची कारवाई करणे, जप्त करण्यात आलेल्या जंगम व स्थावर मालमत्ताचा जाहीर लिलाव करणे, पाणी पुरवठा खंडीत करणे यासारखी कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. मालमत्ता कर भरणेबाबत कर वसुली पथकाच्या माध्यमातून थकबाकीदारांना भेटी देवून, जप्तीची व नळ जोडणी खंडीत करणेची कटू कारवाई टाळण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे. शहराच्या विकासाला योगदान देणे ही प्रत्येक नागरीकाची नैतिक जबाबदारी आहे. नागरीकांची गैरसोय टाळण्यासाठी ऑनलाईन सुविधा तसेच देयकावर QR-Code सुविधा देण्यात आली आहे. तरी, मालमत्ता कराचा भरणा त्वरीत करुन महापालिकेस सहकार्य करावे व मालमत्ता जप्ती/सिल/ लिलाव यासारखी अप्रिय कटू कारवाई टाळावी, असे आवाहन मालमत्ता कर विभागामार्फत करणेत येत आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मातोश्री इंदिराबाई सरनाईक हॉस्पिटलचे लोकार्पण




प्रतिनिधी
■ ठाणे

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या शुभहस्ते मातोश्री इंदिराबाई बाबुराव सरनाईक कॅशलेस हॉस्पिटलचे उदघाटन पार पडले. सर्व वैद्यकीय उपचार व मोठ्या सर्जरी सरकारी योजनेतून मोफत केल्या जाव्यात यासाठी आमदार प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून मीरा-भाईंदरच्या धर्तीवर घोडबंदर येथील नळपाडा येथे १५० बेडचे सुपर स्पेशालिटी "मातोश्री इंदिराबाई बाबुराव सरनाईक" या नावाने कॅशलेस रुग्णालयाची उभारणी करण्यात आलेली आहे. या कॅशलेस रुग्णालयाचा फायदाओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघातील लोकमान्यनगर, वर्तकनगर, भीमनगर, शिवाई नगर, उपवन, येऊर येथील आदिवासी पाडे, वसंत विहार, घोडबंदर रोड व आजूबाजूच्या परिसरातील सर्वसामान्य नागरिकांना घेता येणार आहे.

या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे व्यवस्थापन एका सेवाभावी संस्थेला देण्यात आले आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजनेची ज्यांना माहिती आहे अशा संस्थेला हे हॉस्पिटलचे व्यवस्थापन देण्यात आले असून सर्व स्टाफ व हॉस्पिटलचे व्यवस्थापन ही संस्था सरकारच्या मार्गदर्शक तत्वांप्रमाणे सांभाळणार आहे.

**केनरा बैंक Canara Bank** A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate

**काकड मार्केट शाखा :** पोस्ट बॉक्स नं.: २६१५,
काकड मार्केट, ३०६, काळबादेवी रोड, मुंबई ४००००२.
**फोन** - +९१ २२-२२०१ ६८८८ / २२०६ ५३३३ **ई-मेल :** cb0223@canarabank.com

**शुद्धीपत्रक**

दि. १३/१०/२०२४ रोजी ताबा सूचना [कलम १३(४)] स्थावर मालमत्तेसाठी नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यात स्थावर मालमत्तेचे वर्णन मध्ये **सदनिका क्र. २०३** असे छापण्यात आले होते त्या जागी सदनिका क्र. २०२ असे वाचण्यात यावे.

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी, कॅनरा बँक**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
पाणी पुरवठा विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिके तर्फे जॉन्सन जलकुंभाची रंगरंगोटी करणे या कामाबाबत ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. कोरे निविदा प्रपत्र महानगर पालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि. १५.१०.२०२४ ते दि. २२.१०.२०२४ पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि. २२.१०.२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. व सदरची निविदा दि. २२.१०.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजता उघडण्यात येतील. निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत संकेतस्थळ येथे उपलब्ध आहे. निविदा प्रपत्राची माहिती कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्धआहे.

ठामपा/पिआरओ/पा.पु/८१५/२०२४-२५ सही/-
दि:१४.१०.२०२४ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका,ठाणे
**www.thanecity.gov.in**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका, ठाणे अनुभवी निविदाकारांकडुन "वागळे प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्रमांक १६, १७ व १८ मध्ये विविध ठिकाणी गटार दुरुस्त करुन चेंबर कव्हर्स व लोखंडी झाकणे बसविणे_कामांसाठी ई-टेंडरींग पध्दतीने निविदा मागवित आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/ निमशासकिय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/स्थानिक स्वराज्य संस्था इ.यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https:// mahatenders.gov.in येथे दि. १५/ १०/ २०२४ ते दि. २२/१०/२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि. २२/१०/२०२४ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि. २३/१०/२०२४ रोजी १६.०० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/ सा.बा-वा. प्र.स /७९५/२०२४-२५ **सही/-**
दि. १४.१०.२०२४ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**
म्हाडा MHADA

**ई-निविदा सूचना क्र. १५७ / २०२४-२५**

कार्यकारी अभियंता | पश्चिम विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४३२) हे जिल्हा उप निबंधक - ३ ( पश्चिम उपनगरे) यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकुण २८ कामाकरीता बी- १ (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | १५/१०/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | २२/१०/२०२४ दुपारी ३:०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | २३/१०/२०२४ दुपारी ३:०५ नंतर | ४ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | २४/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.
**CPRO/A/ 1004**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (प),**
**मुं. झो. सु. मंडळ, मुंबई**

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना क्र. १५९/२०२४-२५**

कार्यकारी अभियंता [पश्चिम) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४ ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) हे जिल्हा उप निबंधक-३ (पश्चिम उपनगरे) यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकुण ४ कामाकरीता बी-१ (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | १५/१०/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | २२/१०/२०२४ दुपारी ३:०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | २३/१०/२०२४ दुपारी ३:०५ नंतर | ४ | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | २४/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.
CPRO/A/1007

Follow us: @mhadaofficial

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (प),**
**मुं. झो. सु. मंडळ, मुंबई**

म्हाडा - गृहनिर्मान क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**
**विद्युत विभाग**

**निविदा सुचना क्र. ०७ (२०२४ - २०२५)**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत ०४ विद्युत कामांकरीता ऑन लाईन निविदा मागविण्यात येत आहे. निविदा सुचना व निविदा प्रपत्र महापालिकेच्या संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर दिनांक १५/१०/२०२४ ते २२ / १० / २०२४ पर्यंत सायं ०५.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे.

ऑन लाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि. १५/१०/२०२४ ते २२/१०/२०२४ रोजी साय ०५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि. २४/१०/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील. काम क्रं १ करीता निवीदापूर्व बैठक दिनांक १८/१०/२०२४ रोजी ११.०० वाजता शहर अभियंता यांचे कार्यालयात आयोजित केली आहे.

जाक्र. कडोंमपा/ जसंवि/मुका /१८३२
दि. - १४/१०/२०२४

सही/-
शहर अभियंता
कल्याण डोबिंवली महानगरपालीका, कल्याण

**नवी मुंबई महानगरपालिका**
**अभियांत्रिकी विभाग**
**निविदा सुचना क्रमांक - नमुंमपा/शहर अभियंता/270/2024-25**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | बेलापूर विभागातील से.19/20 बेलापूर गाव येथील रेल्वे ट्रॅक जवळील नाल्यास संरक्षक भिंत बांधणे स्मशानभुमी ते विद्या उत्कर्ष शाळे पर्यत नवीन गटार बांधणे. | 68,65,998/- |
| 2 | बेलापुर विभागातील सीबीडी से.15 सनकॉस्ट बिल्डींग समोरील प्लम वॉलला ग्रेनाइट लादी बसवुन बैठक व्यवस्था करणे. | 56,03,150/- |
| 3 | बेलापुर विभागातील नागरी आरोग्य केंद्राची व हॉस्पीटलची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | 37,35,535/- |
| 4 | बेलापूर विभागातील नेरुळ से.27 येथील प्लॉट नं 23 अे वर गार्डन विकसित करणे बाबत. | 36,15,946/- |
| 5 | बेलापूर विभागातील करावे से.36 मधील नागदेवी मंदीर येथील सर्व्हीस रोडलगत पदपथाची व दुभाजकाची सुधारणा करणे. | 30,46,562/- |

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.15/10/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकरण्याचा अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-
**( शिरीष आरदवाड )**
**शहर अभियंता**
**जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/656/2024 नवी मुंबई महानगरपालिका**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रोमा केअर महानगरपालिका रुग्णालय, जोगेश्वरी (पू), मुंबई-४०००६०.
**क्र. एचओ/ ६१२५/ एचबीटीएच/ दिनांकीत १४/१०/२०२४**

**ई-निविदा सूचना**

हि ई-निविदा सूचना आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका चे आयुक्त खालील कामासाठी लघू ई-निविदा मागवित आहेत.

| अनु. क्र. | बोली क्र. | छाननी शुल्क | इरठे रु | बोली सुरू दिनांक आणि वेळ | पूर्व बोली बैठक दिनांक आणि वेळ | बोली समाप्ती दिनांक आणि वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एचबीटी ट्रोमा केअ रम्युन. जन. हॉस्पिटल, जोगेश्वरी (पू) मुंबई येथे फायर हायड्रंट सिस्टीमच्या तपासणीसह अग्नि सुरक्षा साहित्याची देखभाल आणि बसविणे बोली क्र.; २०२४_ एमसीजीएम_१११५६७६ | रु. ३,३००/- + १८% जीएसटी | रु. १५,५००/- | १५.१०.२०२४ रोजी ११:०० वा. पर्यंत | एन. ए. | २१.१०.२०२४ रोजी ११.०० वा. |

इच्छुक निविदाकारांनी निविदेच्या अधिक माहितीसाठी महापालिका संकेतस्थळ https://mahatenders.gov.in ला कृपया भेट द्या. शुद्धिपत्रक जर असल्यास केवळ महाटेंडर आणि बृमनपा पोर्टलवरच प्रसिद्ध करता येईल. निविदा कागदपत्रे टपालाद्वारे वितरीत किंवा स्वीकारली जाणार नाहीत.

पीआरओ/१७८९/जाही/२०२४-२५

सही/-
वेद्यकीय अधिक्षक
हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे
ट्रोमा केअर महानगरपालिका रुग्णालय, जोगेश्वरी (ई)

**जेथे जेथे पाणी साचते, तेथे तेथे डासांचे फावते.**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**घकव्य विभाग : का. अ. वाहतूक पूर्व उपनगर)**

**ईई/वाह/पू उ/८९९४/घकव्य दि.१४.१०.२०२४**

**ई-निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिका (बृमनपा) पात्र बोलीदारांकडून कार्य. अभियंता (वाहतूक) पू. ऊ. अंतर्गत विविध **गॅरेजेस आणि प्रशासकीय कार्यालयांच्या ठिकाणी डेस्कटॉप पीसी आणि पेरिफेरलचा पुरवठा, बसविणे, तपासणे आणि कार्यान्वित करणे ह्यासाठी ऑन लाईन बोली मागविण्यात येत आहेत.**

ई-निविदा महाटेंडर पोर्टल (https://mahatenders.gov.in) वर उपलब्ध आहे. इच्छुक अर्जदार वरील संदर्भित कामासाठी माहिती/ स्पष्टीकरण कार्य. अभि. (वाह), पू/उ १ ला मजला, पंतनगर गॅरेज बिल्डींग, बेस्ट डेपो मागे, पंतनगर, घाटकोपर (पू) मुंबई ४०००७५ ह्यांच्याकडून प्राप्त करता येईल. ई-निविदा विक्रेता लॉग इन आयडी आणि प्रक्रीया संबंधित

**कार्यकारी अभियंता (वाहतूक) प/उ ह्यांचे कार्यालय**
**पंतनगर गॅरेज इमा. १ ला मजला, पंतनगर,**
**घाटकोपर (पू) मुंबई ४०००७५**

बोली सुरु दिनांक १५.१०.२०२४ रोजी स. ११.०० वा. नंतर आणि बोली समाप्ती दिनांक २२.१०.२०२४ रोजी सायं. ४.०० वा. पर्यंत आहे.

इच्छुक बोलीदार टेंडर्स महाराष्ट्र पोर्टल (https://mahatenders.gov.in) तसेच बृमनपा पोर्टल (https://portal.mcgm.gov.in) ला अधिक महैतीसाठिया भेट देऊ शकतात.

निविदा कागदपत्रे टपालाद्वारे जारी किंवा स्वीकार केली जाणार नाहीत.

पीआरओ/१७७८/जाही/२०२४-२५

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (टीआर) पू/ ऊ**

**आठवड्याचा एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळा.**

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



नरेंद्र मोदी
पंतप्रधान



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

## सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन

# २४ महिने, ४२ निर्णय

## संकल्प निरोगी महाराष्ट्राचा




सार्वजनिक आरोग्य विभागाची विश्वविक्रमी कामगिरी!

**पालखी मार्ग आणि पंढरपूर महाआरोग्य शिबिरात १५,१२,७७४ वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात आली**

पंढरपूर महाआरोग्य शिबिराची सलग दुसऱ्यांदा व परांडा येथील महाआरोग्य शिबिराची पहिल्यांदा असे एकूण ३ वेळा **'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड'** मध्ये नोंद.

## कार्य आरोग्य सेवेचे, यशस्वी जन सेवेचे!

### महिला व बालक

१) **'माता सुरक्षित तर घर सुरक्षित'** अभियानांतर्गत एकूण **४,३९,२४,१००** माता-भगिनींची आरोग्य तपासणी. त्यात **२७,९७,३९४** गरोदर मातांचा समावेश.

२) **'जागरुक पालक, सुदृढ बालक'** अभियानांतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील **२,४९,५४,२५७** बालकांची सर्वांगीण आरोग्य तपासणी आणि संदर्भ सेवा.

३) **मेळघाट** सारख्या दुर्गम भागासाठी **४३ कलमी** कार्यक्रमाची अंमलबजावणी.

४) गर्भधारणापूर्व माता व दोन वर्षापर्यंतच्या बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी **'वात्सल्य'** विशेष योजना.

५) माता मृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात **माहेरघर योजनेला मुदतवाढ.**

६) राज्यातील **स्त्री भ्रूण हत्या** रोखण्यासाठी पीसीपीएनडीटी अंमलबजावणी तक्रार नोंदविण्यासाठी **http://amchimulgimaha.in** हे संकेतस्थळ सुरु व **१०४ टोल फ्री हेल्पलाईन.**

७) बाल मृत्यूदर कमी करण्यासाठी आखण्यात आलेल्या विशेष उपाययोजनांना लक्षणीय यश. राज्याचा बाल मृत्यूदर केवळ **१८ प्रती १००० जन्म/बालमृत्यू शून्यावर** आणण्याकरिता विशेष प्रयत्न सुरू.

### मानसिक आरोग्य

८) जालना, भिवंडी, पुणे आणि नागपूर येथे मानसिक आरोग्य व नवीन **व्यसनमुक्ती केंद्रे.**

९) ठाणे व कोल्हापूर (उदगाव) येथे **अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालय.**

### कर्करोग आणि उपचार

१०) राज्यामध्ये ४ ठिकाणी **नवीन रेडिओथेरपी** युनिटची स्थापना.

११) कर्करोगावरील उपचारासाठी **३४** जिल्ह्यांमध्ये **केमोथेरपी डे-केअर सेंटर.**

१२) **८ मोबाईल कर्करोग निदानाची** सुविधा उपलब्ध.

### आस्थापना/रिक्त पदांची भरती

१३) राज्यातील **वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे बदल्या.** अधिक पारदर्शकता आणि अचूकतेसाठी निर्णय.

१४) आरोग्य सेवेत गट 'क' व 'ड' संवर्गातील **रिक्त १०,९४९ पदांची पारदर्शक भरती.**

१५) **वैद्यकीय अधिकाऱ्यांची** युद्धपातळीवर भरती. **१,४४६** अर्हताधारक उमेदवारांना पदस्थापनेचे **ऑनलाईन आदेश.**

* **२८३ बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांना ऑनलाईन नियुक्तीचे आदेश.**
* **राज्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे व्यवसायरोध भत्ता देण्यास मंजुरी.**

### आरोग्य सुविधा

१६) **हृदयरोग रुग्णांसाठी** राज्यात **१६** ठिकाणी कार्डियाक कॅथलॅब, **२२** ठिकाणी एमआरआय, **४९५** ठिकाणी डायलिसीस सुविधा.

१७) धाराशिव येथे **'फिरते मल्टीस्पेशालिटी रुग्णालय'** सुरू.

१८) आधुनिक उपकरणासहित व तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकासह **१,७५६ ॲम्बुलन्स** खरेदीचा निर्णय.

१९) राज्यातील रुग्णांना किडनी स्टोन आजारावर अत्याधुनिक उपचारासाठी **लिथोट्रीप्सी** उपचार सेवा.

२०) रुग्ण मृत्यू पावल्यास मृतदेह रुग्णालयातून नेण्यासाठी **प्रत्येक तालुक्यात एक शववाहिका.**

२१) **२३४** तालुक्यांतील ग्रामीण रुग्णालयात **डायलिसीस सेवा.**

२२) प्रत्येक जिल्ह्यात **हिमोफिलिया डे-केअर** सेंटर उपलब्ध.

२३) राष्ट्रीय **सिकलसेल** मिशन अंतर्गत **३० लाखांपेक्षा जास्त** नागरिकांची सिकलसेल तपासणी.

२४) साथरोगाच्या उद्रेक, रुग्ण संख्या व मृत्यूमध्ये **लक्षणीय घट.**

### तरुण आणि ज्येष्ठ नागरिक

२५) **'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे'** अभियानांतर्गत १८ वर्षांवरील सुमारे **३ कोटीपेक्षा** अधिक पुरुषांची तपासणी.

२६) **मोतिबिंदूमुक्त** महाराष्ट्र अभियानांतर्गत **१ लाखांपेक्षा** अधिक शस्त्रक्रिया.

### पायाभूत सुविधा

२७) पंढरपूर येथे राज्यातील पहिले **१,००० खाटांचे** वारकऱ्यांच्या आरोग्य सेवेसाठी कायमस्वरूपी सुसज्ज रुग्णालय.

२८) **महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाची स्थापना.**

२९) पुणे, अहिल्यानगर, नंदुरबार, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांमध्ये **३० खाटांची आयुष रुग्णालये.**

३०) राज्यात आतापर्यंत **३४७ 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना'** कार्यान्वित. ७०० 'आपला दवाखाना'ची अंमलबजावणी सुरु.

३१) **'सुंदर माझा दवाखाना'** अभियानांतर्गत आरोग्य संस्थांची स्वच्छता आणि सुशोभीकरण.

३२) **राज्यातील १५ आरोग्य पायाभूत सुविधा प्रकल्पांचे** मा. पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन आणि लोकार्पण.

### महाआरोग्य शिबीर

३३) **'आरोग्याची वारी पंढरीच्या दारी'** उपक्रमांतर्गत
वर्ष २०२३ - **११ लाखांपेक्षा** अधिक
वर्ष २०२४ - **१५ लाखांपेक्षा** अधिक
**२ वर्षात २६ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी** आणि संदर्भ सेवा.

३४) पंढरपूरच्या महाआरोग्य शिबिराची **'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड'**मध्ये नोंद.

३५) ग्रामीण भागातील जनतेला गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी परांडा येथे **महाआरोग्य शिबीर.**

### मोफत उपचार व आरोग्य संरक्षण

३६) **महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे** आरोग्य संरक्षण **रु. १.५० लाखांवरून ५ लाख रुपयांपर्यंत वाढवले.** योजना राज्यातील सर्व रहिवाशांना लागू. **(रेशन कार्ड अट रद्द)**

३७) राज्यात सुमारे **५ कोटी** पेक्षा जास्त जनतेची आयुष्मान भारत डिजिटल अकाउंट नोंदणी.

३८) सर्व नागरिकांना १५ ऑगस्ट २०२३ पासून **मोफत वैद्यकीय उपचार.** गेल्या वर्षभरात बाह्यरुग्ण लाभार्थी संख्येत दुपटीने वाढ.

### आशा व गटप्रवर्तक/कर्मचारी

३९) आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांना कर्तव्य बजावताना अपघाती मृत्यू झाल्यास **रु. १० लाख** व कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास **रु. ५ लाख** सानुग्रह अनुदान.

४०) **आशा स्वयंसेविकांच्या मोबदल्यामध्ये भरघोस वाढ.** मासिक मानधनामध्ये **रु. ५,०००** वाढ. आता **रु. १३,०००** प्रती महिना.

४१) **आशा गटप्रवर्तकांच्या मोबदल्यामध्ये रु. ४,००० भरघोस वाढ.** आता प्रती महिना **रु. १९,९७५.**

४२) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या **कंत्राटी कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवेतील मंजूर समकक्ष पदांवर सामावून घेण्यास मंत्रिमंडळाची मान्यता.**

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी ४६७३



देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

प्रा. डॉ. तानाजी सावंत
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

**मोफत आरोग्य सल्ला मिळविण्यासाठी डायल करा**
**टोल फ्री क्रमांक १०४**